# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

## जनजागरण कार्य



डॉ. भास्कर गिरधारी

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे
# जनजागरण कार्य



## डॉ. भास्कर गिरधारी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : जन जागरण कार्य
Rashtrasant Tukdoji Maharaj : Jan Jagran Karya

© (सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन)

प्रथम आवृत्ती : गुढीपाडवा, ८ एप्रिल, २०१६
प्रथम आवृत्ती : चैत्र शुद्ध प्रतिपदा शके, १९३८.


**Dr. B. V. Girdhari**
E mail : bvgirdhari@gmail.com
Website : www.bvgirdhari.com
Mo. No. : 9823012301/7588706885

विभा प्रकाशन, पुणे
'आसावरी' जे १२०२ नांदेड सिटी,
सिंहगड रोड, (धायरी फाट्यापुढे)
पुणे ४११०४१.
स्थिरभाष : ०२०-६७५२४२०२
०२०-२४३०८०८९

अक्षर जुळणी : स्मिता गुजर

मुद्रक : सुविधा प्रिंटर्स
शॉप नं. १, चिटको सेंटर, वकीलवाडी
नाशिक १ स्थिरभाष : ०२५३ - २५७५७७५

मूल्य : १०० रुपये



“सर्व संतांना,
संत वाङ्मयाच्या अभ्यासकांना,
आणि स्वदेश भक्तांना
सादर समर्पण ...............”

# मनोगत

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जनजागरण कार्य' हे पुस्तक नाशिक आकाशवाणी केंद्राच्या प्रेरणेने सिद्ध झाले आहे. एक वेगळा संत निवडा आणि त्यावर व्याख्याने द्या असे कार्यक्रम अधिकाऱ्यांनी मला सांगितले. त्यामुळे समर्थ रामदासस्वामी, वारकरी संतमेळा, संतांनी केलेले सामाजिक प्रबोधन हे नेहमीचे विषय बाजूला ठेवून मुद्दाम संत तुकडोजी महाराज व्याख्यान निमित्ताने अभ्यासाला निवडले.

अवघ्या तिसऱ्या इयत्तेपर्यंत शिकलेला माणूस जपानला जाऊन येतो. त्याचे नाव नागपूर विद्यापीठाला दिले जाते ही अभूतपूर्व घटना म्हणावी लागेल. म्हणूनच या थोर महात्म्याने केलेले जनजागरण कार्य सर्वदूर घराघरात पोहचविणे आवश्यक आहे असे वाटले. त्यावर शोध घेतला असता शाळकरी पुस्तकांखेरीज फारशी चिंतनगर्भ सामग्री, लिखाण आढळले नाही म्हणून फक्त संत तुकडोजी महाराज यांच्याच लेखणीचा प्रमुख आधार घेतला. त्यात त्यांची ग्रामगीता, भजनावलीचे सर्व भाग अभ्यासले. त्यातून हे चिंतन साकार झालेले आहे.

तेवढ्यासाठी विदर्भ परिसरातील 'मोझरी' गावालाही समक्ष भेट देता आली. तेथील संत तुकडोजी महाराजांचा महिमा आणि त्यांच्या महान कार्याची अनुभूती आली. तेव्हा हे आकाशवाणीच्या निमित्ताने झालेले लेखन प्रसिद्ध करणे गरजेचे वाटले. मी आकाशवाणी नाशिक केंद्राचा अंत:करणापासून ऋणी आहे. त्याचप्रमाणे बुकगंगा डॉटकॉम यांचा आणि अक्षरजुळणीसाठी स्मिताताई गुजर यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. मुद्रणाची जबाबदारी सुविधा प्रिंटर्सने उत्तम प्रकारे पार पाडल्याबद्दल त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे समस्त अनुयायी चाहते आणि संतवाङ्मयाचे अभ्यासक, वाचक या छोटेखानी पुस्तिकेचे स्वागत करतील असा मला विश्वास आहे.

– *भास्कर गिरधारी*

## देवभक्तीसह राष्ट्रभक्ती :

संत तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल, १९०९ मध्ये विदर्भप्रांतातील 'यावली' ता. अमरावती येथे झाला. 'आकोट' चे हरिबुवा आणि 'माधान'चे गुलाबराव महाराज यांची प्रेरणा आणि आशीर्वाद तुकडोजींना लाभले. संत तुकडोजी महाराज यांचे संपूर्ण नाव होते, 'माणिक बंडोजी ठाकूर' या 'माणिक'चे शिक्षण फक्त तिसऱ्या इयत्तेपर्यंतच झालेले होते. माणिकला संत अडकोजी महाराजांनी 'तुकडोजी' हे नाव दिले होते.

शिक्षणाचे महत्त्व आणि भेदभाव सर्व सोडा हे सांगणारा त्यांचा प्रमुख ग्रंथ म्हणजे 'ग्रामगीता' होय. स्वच्छतेचे महत्त्वही त्यांनी सर्वत्र सांगितले आहे. परधर्माबद्दलचा आदरभाव त्यांनी व्यक्त केला आहे.

*''लहान ऐशा गावामाजी। मागासलेल्या जनसमाजी।*
*उपासाचीच लाभे रोजी। ऐशा ठायी जन्मलो।*
*घरी दारिद्र्याचे वरदान। परिभाव भक्तीची नसे वाण।*
*ऐका सुसंस्काराचे गान। सोशित कष्ट वाढलो।।*

वडील बंडोजी शिवणकाम करीत. आई घरकामाबरोबर दळणकांडण करी. कसाबसा प्रपंच सावरला जायी. बालपणीच भजनपूजन, धार्मिकता तुकडोजींना आवडत असे. तुका म्हणे प्रमाणेच 'तुकड्या म्हणे' हे नाव धारण करेल असे म्हणूनच त्यांनी आपले मौलिक विचार मांडले आहेत –

*तुकड्या नावाने लोकीं मी खेळलों।*
*उजेडिया आलो तुकडे खाता।।*

भक्तीच्या माध्यमातून देशाचा उत्कर्ष घडवून आणावा. गुलामगिरीतून भारतमातेला मुक्त करावे हा त्यांचा संकल्प होता. देवभक्ती बरोबरच राष्ट्रभक्तीची भावनाही त्यांच्यात रुजली. आणि ती संपूर्ण समाजात रुजविण्याचा प्रयत्न त्यांनी जीवनभर केला. देशभक्तीपर भजने गात गात खेडोपाडी, गावोगाव त्यांनी संचार केला.

■ ■ ■

## धर्मजागरण :

*'संत ओळखावा वृत्तिवरून। अथवा सद्गुण पाहोनिया'*
संत तुकडोजी महाराजांच्या या उद्गाराचे मर्म आपण जाणून घेऊ या. संत सज्जनांची संगत त्यांनी स्वत: धरली आणि समाजालाही तोच संदेश दिला. साधी राहाणी आणि उच्च विचारसरणी असलेल्या माणसांनाच नेहमी जवळ करावे. हे लोकशिक्षणाचे कार्य संत तुकडोजींनी आपल्या भाषणातून, लेखनातून आणि गायनातून सर्व समाजापर्यंत पोहोचविले. त्यांचा 'गुरुकुंज' हा 'मोझरी' येथील आश्रम म्हणजे याच सद्विचारांचा महासागर बनला आहे. विदर्भात संत तुकडोजींच्या विचारांचा प्रभाव सर्वत्र पसरलेला आहे. स्वराज्याचे सुराज्य झाले पाहिजे असा विचार त्यांनी अंमलात आणला. लोकांसमोर मांडला. त्यासाठी तुकडोजींनी ग्रामोद्योग, गोरक्षण, व्यायामशाळा, कृषिकेंद्र, दवाखाना, प्रशिक्षण प्रशाला, विद्यालय, वसतिगृह असे विविध प्रकल्प कार्यन्वित केले. विचारांची कास धरून तोच ध्यास घेतला की अशी कार्ये उभी राहतात. अतोनात

कष्ट घेऊन त्यांनी आपल्या विचारधारेनुसार या प्रकल्पांची पूर्तता केली. आज मूर्त स्वरुपात संत तुकडोजींच्या विचारांचा प्रभाव सर्वत्र जाणवतो आहे.

या राष्ट्रसंतांच्या विचारात समाजाभिमुखतेला प्राधान्य होते. म्हणूनच त्यांनी अध्यात्म साधना सामूहिक भजनातून सर्वांसह केली. ढोल, शंख, खंजिरी, एकतारी या वाद्यांच्या तालावर कीर्तनातून आणि भजनातून त्यांनी आपल्या विचारांची पेरणी केली. समाजात धर्माचे लोकजागरण केले.

■ ■ ■

## भारत साधु-समाज :

'भारत साधु-समाज' स्थापन करून, अखिल भारतीय पातळीवर विचारवृष्टी करून, संत तुकडोजी महाराजांनी जनज़ागरण केले.

*झाड-झडुले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना।*
*पत्थर सारे बॉम बनेंगे, नाव लगेकी किनारे।।*

त्यांच्या वा कवनांमध्ये इंग्रजांच्या विरोधातल्या १९४२ च्या चळवळीतला आपला सहभाग नोंदविला आहे. यातूनच त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. पण त्यांची प्रेरक, स्फूर्तिदायी, देशभक्तीपर गीते अजरामर झाली आहेत. या पंक्तीत ते म्हणतात. वेळप्रसंगी देशासाठी आमची भक्तमंडळीच सैन्याचे रूप धारण करील आणि आमच्या हातात स्वच्छतेसाठी घेतलेला झाडुसुद्धा शस्त्रास्त्राचे रूप धारण करील. इंग्रजांच्या विरुद्धाच्या त्वेषाने इथले दगडधोंडे सुद्धा स्फोटक बॉम्ब

बनतील आणि आमची ही भारत देश स्वतंत्र करण्याची नाव किनाऱ्याला लागेल. त्यांच्या जीवापाड आवडीच्या, धुंद होऊन वाजविलेल्या खंजिरीतून असे हे विचार निनादत होते. भारतातील थोर व्यक्तींनी महात्मा गांधी, पंडित मालवीय, डॉ. राजेंद्र प्रसाद, आचार्य विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, सानेगुरुजी या महान व्यक्तींनी, संत तुकडोजी महाराजांनी जनसमुदायात वाटलेल्या या विचारधनाबद्दल, मुक्तकंठाने गौरव केला आहे. यामध्ये संत तुकडोजी यांच्या व्यक्तिमत्वाचे मोठेपण स्पष्ट होते.

■ ■ ■

## केले मनन सर्वकाळ :

राष्ट्रसंत तुकडोजींची प्रतिभा त्यांच्या या सुविचारांनीच जन सामान्यांच्या अंत:करणात अत्यादराने कोरली गेली होती. आजदेखील विशाल जनसमूहाच्या मनात संत तुकडोजी महाराजांना अत्यादराचे स्थान आहे. त्यांचे विचार, आचार, उच्चार सारेच उदात्त होते. आपल्या आत्मनिवेदनात त्यांनी म्हटले आहे.

*'काही योगाचे साधन। थोडे अध्यात्मवाचन।*
*विशेष विश्व निरीक्षण। केले मनन सर्वकाळ।*

या उद्‌गारात संत तुकडोजींच्या जीवनाचे सगळे रहस्य सामावलेले आहे. अखिल मानवजातीचे कल्याण व्हावे यासाठीच संत तुकडोजींनी आपले जीवनसर्वस्व ईश्वरसेवेत,

योग साधनेत, अध्यात्मसाधनेत वेचले आहे. राष्ट्रसेवा कार्याला या अधिष्ठानाची गरज असते, हे त्यांनी सर्वांना पटवून दिले. कर्मकांडावर त्यांचा फारसा विश्वास नव्हता म्हणून तुकडोजी महाराजांनी माझ्या चितेच्या भोवती फक्त शांती पाठ म्हणावा. मंदिर बांधू नका, असे त्यांनी स्वतःच सांगितले होते. 'मला जर जनता जनार्दनाच्या सेवेत पुनर्जन्म लाभला तर लोकांच्याच सान्निध्यात मी तो घालवीन' असे उदात्त विचार. संत तुकडोजींचे होते. यावरून त्यांच्या या विचारांची, व्यक्तिमत्वाची झेप कशी उत्तुंग होती, याची प्रचीती येते.

या राष्ट्रीय चिंतनाचे अधिष्ठान त्यांच्या संतत्वाला होते. राष्ट्रीय संत जीवनाचा एक सर्वांग सुंदर आविष्कार संत तुकडोजींच्या व्यक्तिमत्वात पाहावयास मिळतो. त्यांच्या विचारातील समाजकारण आणि अध्यात्मजीवन यांचा हा मनोज्ञ मेळ आहे.

■ ■ ■

## संत तुकडोजींची ग्रामगीता :

*'गावा गावासी जागवा। भेदभाव हा समूळ मिटवा।*
*उजळवा ग्रामोन्नतीचा हा दिवा। तुकडया म्हणे।।'*

अद्यापही खेडेगावात लिहिणे वाचणे कमी म्हणून त्यांनी खेडूतांना पचेल, रुजेल तेच सोप्या भाषेत आळवले आणि म्हणून संत तुकडोजी महाराजांची प्रसिद्ध ग्रामगीता घराघरात पोहचली. जर अद्यापही पोहचली नसेल तर ती पोहचवावी

लागेल, एवढे या ग्रामगीतेचे भगवद्गीतेसारखेच महत्त्व आहे. सगळ्या कामांची योग्यता सारखीच आहे. स्वामी विवेकानंदांनीही 'कामे सर्वचि मूल्यवान। त्याची योग्यता समान' हेच सांगितले आहे.

*।। श्रीकृष्णे सिद्ध केले उच्छिष्टे काढून।*
*ओढिली ढोरे विठ्ठले।''*

*मंदिरी बसूनी नाक दाबावे।।'* यापेक्षा संत तुकडोजी म्हणतात–

*'मार्गीचे काटे उचलावेत। दुःखिताशी पाणी पाजावे।*
*हे धर्म श्रेष्ठ तीर्थस्नानाहुनी।।'*
*'एक हात खोदिली जमीन। ते पूजनाहूनी पूजन।*
*परिणाम शेकडो व्याख्यानाहून। अधिक त्याचा।।'*

असा हा ग्रामगीतेच्या उपदेशाचा प्रसाद घेऊन नवतरुणांनी, नव्या पिढीतील समाजसेवकांनी त्याचा प्रचार, प्रसार करावा. ग्रामरचनेच्या कामाला त्यातून योग्य वळण लागेल. अध्यात्मसाधना आणि जीवन व्यवहार याची सुंदर सांगड, सुयोग्य समन्वय या तुकडोजींच्या ग्रामगीतेत आहे. 'ग्रामगीता' हे नावच मुळी सार्थ आहे. देवघरात शांतपणे तेवणाऱ्या नंदादीपासारखीच ही ग्रामगीता आहे.'

■ ■ ■

## देशाचा आत्मा 'ग्रामजीवन' :

*मानावयाचे प्रथम माहेर। आपुले गाव त्यातील घर*
*यातुनी प्रगती करीत सुंदर। पुढे जावे विश्वाच्या।।*
*गावची जरी उत्तम नसेल। तरी देशाचे भवितव्य ढासळे।*
*ऐसे जाणावे जाणत्याने भले। हृदयामाजी।।*
*ग्रामातील जन सर्वेश्वर। जाणावे ग्राम हेच मंदिर।।*
*सेवा हेची पूजा समग्र। हाच विचार निवेदावा।*

ग्रामीण भागातील सामान्यजणांच्या मनी मानसी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जाऊन बसले म्हणून त्यांना हे चिंतन स्फुरले आहे. ग्रामीण जीवनातील अंधाराला मागे हटवून प्रकाशाची सोनेरी आश्वासक किरणे आणण्यासाठीच या संताने आपली सगळी हयात घालविली होती. असा हा त्यांचा ग्रामजीवन पुनर्घटनेचा, पुनर्रचनेचा सूत्रपाठ म्हणजे हे ग्राम चित्रण आहे. भू वैकुंठातील आदर्श खेड्यांचा भारत निर्माण व्हावा हीच तुकडोजी महाराजांची प्रबळ इच्छा आणि विचारधारा होती. संत तुकडोजींचे कार्य क्रांतिकारक विचारांनी प्रेरित होते. आपली वाणी आणि लेखणी, सारी शक्ती, भक्तीचे सगळे सामर्थ्य एकवटून त्यांनी ही समाजजागृती केली. झोपी गेलेल्या खेडूतांना, त्यांच्या खेड्यांना जागविले. त्यांच्या ठायी असलेले अज्ञान, लोकभ्रम आणि सामाजिक जडत्व यामुळे त्यांच्या जीवनाला प्राप्त झालेली अवकळा नाहिशी केली, खेड्यातील अडाणी मनाचे आरसे स्वच्छ पुसले जावेत असे पाहिले. सुखी व सुधारलेल्या

जीवन स्वप्नांची प्रतिबिंबे ह्या ग्रामस्थांच्या मनामनात उमटविली. त्यांचे मरगळलेले जीवन चैतन्यमय बनविले. आपला देश शिक्षण, आरोग्य, धनधान्य याबाबतीत समृद्ध व्हावा यासाठी संत तुकडोजींच्या तळमळत्या मनाने हा वसा घेतला हे या विचार मंथनातून जाणवते. ग्रामजीवनाची म्हणजे पर्यायाने देशाची उन्नती हे व्यापक सूत्र या विचारात अंतर्भूत आहे. ग्रामजीवन, कृषिप्रधानता हा आपल्या भारत देशाचा आत्मा आहे, त्यांच्या उत्थानातच भारताचा खरा विकास आहे ही मूलभूत जीवनदृष्टी तुकडोजींना लाभली होती. म्हणून त्यांचे विचार समाजाला डोळस बनवितात.

■ ■ ■

## सात्विक समाधान :

*राज्यास जी महाली। सौख्ये कधी मिळाली।।*
*ती सर्व प्राप्त झाली। या झोपडीत माझ्या।।*
*महाले आणि तिजोऱ्या। त्यातूनी होती चोऱ्या।।*
*दारास नाही दोऱ्या। या झोपडीत माझ्या।।*
*महाली मऊ बिछाने। कंदील श्यामदाने।।*
*आम्हा जमीन माने। या झोपडीत माझ्या।।*
*भूमीवरी पडावे। ताऱ्यांकडे पाहावे।।*
*प्रभुनाम नित्य घ्यावे। या झोपडीत माझ्या।।*
*तुकड्या म्हणे फकीरा। भक्तीचा तो भुकेला।।*
*'तुकड्याकडे बघावे। किती आनंदी आनंद।।'*

संत तुकडोजी महाराजांनी येथे समाधानी, आनंदी

वृत्तीचे विचार प्रगट केले आहेत. ते म्हणतात की या माझ्या गरिबाच्या झोपडीत मला माझे सारे काही सुख-समाधान आनंद मिळाला आहे. महाराजे लोकांना त्यांच्या महालात जे सुख मिळत नाही, ती सुखं, ते सारे काही या झोपडीत मी भरून पावलो आहे. या दोऱ्या नसलेल्या झोपडीत चोरीची भीती नाही. जिथे तिजोरी, संपत्ती सोनेनाण्याचे गाठोडे असते तिथेच चोरीची भीती असते.

मऊ बिछान्यापेक्षा माझी उघडी जमीनच मला जास्त मानवते. परमेश्वरही शेवटी भक्तीचा, भावाचाच भुकेला असतो, तेच मला झोपडीत राहून नीट साधते. 'भुकेला कोंडा, निजेला धोंडा' अशी ही स्थितीही मन:शांती असेल तर मन आनंददायी असते. अशीच एक म्हण आदिवासी बांधवांमध्ये रुढ आहे. 'फडका घे, मडका घे सूट' याचा अर्थ माणसाला सुखा-समाधानाने जगण्यासाठी फार काही लागतच नाही. लज्जा राखायला एक फडका आणि अन्न पाण्यासाठी एक मडकेही पुरे होते. हेच सात्विक समाधान संत तुकडोजी या अभंगात व्यक्त करतात.

■ ■ ■

*'खोप माझी मोड की जर्जर। काय करू पाहुणचार।।'*
– असे तुकोबारायांनीही अभंगात लिहून ठेवले आहे. हीच स्थिती तुकडोजींची आहे.

*संसाराचा बोझ वाहता। टेकलासे मरणाला।।*

*नेसी साथी कुणाला। बोल बोल साथी नेशी कुणाला।।*

*'मान नाही अन् किर्ती न काही। उगाच फिरतो हेला।*

अशी माणसाची स्थिती होऊन बसते. आपल्याकडे एक म्हण आहे 'जन्माला आला हेला आणि पाणी वाहून मेला' या म्हणी प्रमाणेच संत तुकडोजी महाराजांनी चालता चालता सरणाच्या वाटेवर पोहचत असल्याची चाहूल या अंतर्मुख करणाऱ्या चिंतनात व्यक्त केली आहे. संसाराचा हा बोजा म्हणजे ओझे वाहूनच मरणकाळाजवळ आपण येऊन ठेपतो. आपण वैभवाचा उपभोग घेतला, संपत्तीचा विनाश केला. इतरांचे शोषण केले, कोणालाही सुख दिले नाही. सत्संग केला नाही. माणसे जोडली नाही, माणुसकीचा धर्म जोपासला नाही. दानधर्म केला नाही, तीर्थयात्रा, व्रत आचरण केले नाही. विषयांमध्ये एवढे गढून गेलो पण अजूनही मोह सुटता सुटत नाही. आता अखेरी प्रभू चिंतनाला स्मरणाला तू पारखाच झालास, पण निदान आता तरी तू शुद्धीवर येऊन नीट आपल्या सरत्या आयुष्याचे भान ठेवून 'भज भज रे गोपाळा', नाहीतर तुझी 'पुनरपी जन्मम् पुनरपि मरणम्' या फेऱ्यातून सुटका होणार नाही. माणसाने योग्य वेळी प्रपंच

विषयातून अलिप्त होऊन अध्यात्म चिंतनात गढून गेले पाहिजे, अन्यथा पशुतुल्य 'आहार, निद्रा, भय, मैथून,' हेच जीवन आपल्या वाट्याला येते म्हणून संत तुकडोजी महाराजांचे हे निर्वाणीचे कळकळीचे बोल आहेत.

■ ■ ■

## या भारतात बंधुभाव :

या भारतात बंधुभाव या गीतामध्ये असे संत तुकडोजी महाराजांनी म्हटले आहे की,

*या भारतात बंधुभाव। नित्य असू दे। दे वरची असा दे।।*
*हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे। मतभेद नसू दे।।*

राष्ट्रीय विचारसरणीने भारलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होते. भारतात बंधुभाव नांदावा असे त्यांना मनापासून वाटत होते. सगळे पंथ संप्रदाय यांचे ऐक्य घडवून यावे, एकत्रिकरण व्हावे, त्यांच्यात समन्वय घडून यासा अशी त्यांना तीव्र जाणीव होती. आपापसात परस्परांत कोणत्याही प्रकारचे मतभेद शिल्लक राहू देऊ नको असे ते देवाजवळ मागणे मागतात. धर्मभेद नको, तसाच श्रीमंत आणि गरीब असाही भेदभाव नसावा. अस्पृश्यता तर कोठेही असू नये. जातिभेदाला मूठमाती द्यावी. सर्वांना मानवताधर्म म्हणजेच आपल्या भारतदेशाचा राष्ट्रधर्म हाच आहे हे कळावे. आपण तुम्ही आम्ही सगळ्यांनी शीलवान, सदाचरणी व्हावे हीच या संतसेवक तुकडोजी महाराजांची प्रार्थना आहे. भारताच्या सेवेचा संदेश त्यांनी सगळ्यांना येथे दिला आहे. एवढेच नव्हे तर खल, दुष्ट,

निंदक असे जे आहेत त्यांच्याही मनामध्ये सत्य, न्याय याची प्रतिष्ठापणा होऊ दे. संत तुकडोजी म्हणतात.

*'सौंदर्य रमो घराघरात, स्वर्गीयांपरी।*
*ही नष्ट होऊ दे विपत्ती भीती बावरी।'*
*'मला तुकड्याला मात्र सदासर्वदा सेवेत असू दे।।'*

हेच त्याचे मागणे आहे.

■ ■ ■

## अंधश्रद्धेला फाटा :

संत तुकडोजी महाराजांनी समाजातील अंधश्रद्धेचे दर्शन प्रखरतेने घडविले. ते एके ठिकाणी लिहितात.

*'कोणी करणी, कौटाळ म्हणती। कोटी पिशाच्चास भारिती।*
*औषधेही न देता रोगी मारती। मूर्खपणाने।।*
*भगत, मांत्रिक, अरबाडी जाणते। धुपारे बघती भाविक*
*पोटासाठी नाना मते। फैलविती लोकांमाजी।।*
*कोण ते करविती नवसासायास। थोर देवपूजेचा जोर सोर।*
*रेडे, बकरे, कोंबडे पामर। कापिताति अज्ञानें।।*

आपल्या अशा प्रखर ओव्यांमधून संत तुकडोजी महाराजांनी जनांना विचाराने जागविण्याचा वसा निष्ठेने चालविला. अधिकारी संत व ढोंगीबुवा यांच्यात गफलत होऊ नये म्हणून खऱ्या संतांचे लक्षण सांगताना महाराज म्हणतात.

*'संसारी असोनि संत असती। व्यवहारी राहोनि आदर्श होती।।*
*बुवा न म्हणविताही अधिकार ठेविती। सद्गुरूचा।।'*

ग्रामीण भागातील अडाणी जनतेला धर्माच्या नावाखाली फसविणाऱ्या आणि बुवाबाजी करणाऱ्या लबाड लोकांवर महाराजांनी कडक ताशेरे ओढले आहेत. अंधश्रद्धेच्या विरुद्ध त्यांनी केलेली ही जागृती अपूर्व आहे.

दि. २३ जुलै, १९५४ रोजी जपानमधील 'शिमिझ' (Shimiz) या शहरात भरलेल्या विश्वधर्म परिषदेचे संत तुकडोजींनी उद्घाटन केले. त्यांच्या विचार सौंदर्याने आणि वैभवाने तेथील लोक भारावले. परिषद प्रमुखांनी तेथे विश्वधर्म केंद्राच्या स्थापनेसाठी १०,००० मीटर भूमी एका सुंदर पहाडावर देऊ केली. पण तुकडोजी म्हणाले 'मला या मोहात पाडू नका, माझ्या भारतात माझ्यासाठी अजून खूप काम आहे.'

■ ■ ■

## तुझ्या स्वरूपी सदा आनंद :

*ऐका हा भाव जीवाचा। भक्तिविना उद्धार नाही कुणाचा।।*
*तरण्यासी भवसागर सगळा। अवघड हा षड्-रिपूचा मेळा।।*
*पार कराया या कळिकाळा।*
*नाही दुजा कुणी मार्ग निराळा। निज संदेश शीवाचा।।*

या अभंगात संत तुकडोजी महाराज म्हणतात, 'माणसाने' सरळपणाचे जीवन जगावे. सगळी व्यसने सोडून द्यावीत., सगळ्यांनी परस्पर प्रेम आणि लोभ वाढवावा. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंच्या मेळ्यात आपण अडकून पडतो, हा भवसागर तरुण जाण्यासाठी भक्तीचाच आधार हा खरा आहे. अनुभवी संतांचे अनुभव घ्यावेत,

‘हा जीवाचा भाव ऐका’ असा कळकळीचा संदेश संत तुकडोजी महाराजांनी दिला आहे.

*‘ब्रह्मानंदी टाळी लागली। आता उरला गोविंद।।*

अशी स्थिती निर्माण झाली पाहिजे.

गहिवरल्या कंठातून वाहत्या नयनधारातून संत तुकडोजी महाराज म्हणतात,

*‘गोविंद म्हणा गोविंद। ‘अवघेची धरा हा छंद’।।*

गाताहेत भजनसंत –

*अनुभवची संत स्वच्छंद। तुझ्या स्वरुपी सदा आनंद।।’’*

संत ज्ञानेश्वर माऊलींप्रमाणेच ‘हे विश्वचि माझे घर’ ही संत तुकडोजींची संकल्पना आहे. ते म्हणतात, – ‘विश्वचि घर भासुनी, जीव होतसे सदा दंग’ भक्तीचा खरा रंग प्रगटवणारा हा सत्संग आहे. भक्त ईशसेवेत इतके दंग होतात की ते ब्रह्मच त्यांचे अंगांग होऊन जाते. सगळा अहंकार गळून पडतो लोभ नाहिसा होतो. या प्रेमाची भांग एकदा चढली की मरणाचे दु:खही नाहिसे होते, सौख्याचे राज्य प्राप्त होते.

*‘विश्वची घर भासूनी। जीव हा होत सदा संग।*
*प्रगट तो भक्तीचा रंग। असा हा संतांचा संग।।*

■ ■ ■

## भाव तेथे देव :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नव्या पुरोगामी विचाराला प्राधान्य देतात. त्यांचा पुरस्कार करतात हे त्यांच्या विविध पदातून आपल्या लक्षात येते. त्यांनी म्हटले आहे की देव हा काही

बाजाराचा भाजीपाला नाही. भाजीपाल्याचे मोल कमी असते आणि तो लगेच शिळा होतो. तसे देवाचे नसते. जर तुमच्या अंत:करणात परमेश्वराबद्दल भक्तिभाव नसेल आणि तुम्ही कितीही विनवणी केली, मनात इच्छा धरली देवाला पाव म्हटले, प्रसन्न हो म्हटले तरी देव प्रसन्न होणार नाही. देवाचे मोल भावात आहे ते समजून घ्यावे.

आपले देव कशाकशाचे असतात पण त्याला नश्वरता आहेच. संत तुकडोजी म्हणतात हा दगडाचा देव त्याला वज्र पहाराची भीती असते. मूर्तिभंजन होऊ शकते, मातीचा देव घडवलेला असला तर तो पाण्यात विरघळून जाऊ शकतो. लाकडाचे काही देव, मूर्ती तयार केलेल्या असतात त्यांनाही अग्नीची भीती असते. ते पेट घेऊ शकतात. जळून जाऊ शकतात. सोन्याचांदीच्या बनवलेल्या देवाच्या प्रतिमांना तर कायम चोराची भीती असते. तेव्हा या सगळ्यातच, दगड, लाकूड, माती, सोने, चांदी यात खरा देव सामावलेला नाही. तो राहतो तुमच्या आमच्या हृदयात. भक्तिभावात आहे, ना दगडात, ना लाकडात, ना सोन्या-चांदीत देव राहतो. तो राहतो साधूसंतांनी आपल्या सुमधुर भावभक्तीपूर्ण वाणीने सांगितले आहे, अगदी परोपरीने सांगितलंय की मनात भाव बाळगा देव तिथेच असतो. त्यासाठी आचरणाची गरज आहे. नुसत्या शब्दांच्या बुडबुड्यांनी काही साध्य होत नाही. मनाला शांती खरी लाभत नाही. देवाचे देवत्व सर्वाठायी आहे. देव सर्वत्र आहेच आहे. देव नाही असे स्थान शोधूनही नामदेवाला सापडले नाही. असे म्हणतात शिवाच्या पिंडीवर पाय ठेवून

विसोबा खेचर पहुडले होते, तेव्हा संत नामदेव रागावले व देवावर काय पाय ठेवता म्हणाले. तेव्हा विसोबांनी सांगितले तू उचलून दुसरीकडं ठेव ना. तेव्हा त्या नामदेवाला देव नाही, शिवलिंग नाही अशी जागा गवसली नाही. त्याला मग ईश्वर चराचरात सर्वत्र भरलेला आहे हा साक्षात्कार झाला. हीच गोष्ट भक्त प्रल्हादाच्या बाबतीतही घडली. हिरण्यकश्यपू याने त्याला चवताळून विचारले होते, 'तू म्हणतोस देव सगळीकडे आहे, मग सांग या खांबात आहे का?' असे म्हणून त्याने खांबाला जोरात लाथ मारली आणि त्यातून नरसिंह अवतार, प्रगट झाला. असा हा देवाचा सर्वत्र वास असतो. पण हा देव तुकडोजी म्हणतात त्याप्रमाणे फक्त भावाचाच भुकेला असतो. जिथे खरा भक्तिभाव तिथे तो प्रगट होतो. मग मंदिराचे द्वार फिरते, देव हट्टाने नैवेद्यही खाऊ शकतो. मात्र त्यासाठी तुकडोजी महाराज म्हणतात त्याप्रमाणे मी-तू पणाचा भाव मेला पाहिजे, संपला पाहिजे. अद्वैतभाव प्रस्थापित व्हावा.

*'देवाचं देवत्व आहे ठाई ठाई*
*मी तू मेल्याविण अनुभव नाही*
*तुकड्या दास म्हणे ऐका ही द्वाही*
*देव बाजारचा भाजीपाला नाही रे।'*
*मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव*
*देव अशानं भेटायचा नाही रे*

असा हा 'हरि आठवा आपुल्या मनी भाव धरोनी' हे त्यांचे सांगणे होते. ■ ■ ■

## खंजिरी भजन माला :

संत तुकडोजी महाराजांची भजने जन सामान्यांच्या अंत:करणाचा ठाव घेणारे असायचे. त्यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानात केवळ ईश्वरभक्तीच नव्हती तर समाजातील दु:ख, वेदना विषमता खंत प्रतीत होत होती. संत तुकडोजी महाराजांची खंजिरी, ही भजन पद्धती म्हणजे एक स्वतंत्र निर्मिती होती. त्यातून उठणारे झंकार हे समाजातील माणसामाणसांच्या अंत:करणाला जाऊन भिडत असत. संत तुकडोजींची ही पद्धत एवढी प्रभावी होती की त्यांच्या त्या खड्या आवाजातील असंख्य भजनांनी जनमनाचा ठाव घेतला होता. आपले विचार सर्व सामान्यजनांपर्यंत रुजविण्यात त्यांची खंजिरी भजने नि:संशय यशस्वी ठरली. अंधश्रद्धानिर्मूलन, जातिभेद निर्मूलन यासाठी त्यांनी त्यांच्या या खंजिरीवरील भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावी वापर केला. भजनांजली हेच खऱ्या अर्थाने त्याच्या समाजप्रबोधनाचे वैशिष्ट्य होते.

आवाजांच्या स्वरांच्या स्वरूपात तयार झालेली उर्जा कधीच नष्ट होत नाही. ती उर्जा आसमंतात आवाजाच्या आणि सुरांच्या निनादात कायम वावरत असते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या खंजिरीचा निनाद, तोच सूर, तीच अभिव्यक्ती त्यांच्या शिष्यगणांकडून आजही अनुभवता येते. संत तुकडोजींचे हे समाजप्रबोधन ऐकण्यासाठी हजारो माणसांची विदर्भात रीघ लागत असे.

*'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे,*
*हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे'*

या प्रेरक भजनातील आशय विशेष लक्षात घेण्याजोगा आहे. संत तुकडोजी परमेश्वराजवळ वर मागतात, 'श्रीमंत गरीब एक दिलाने एक मताने सुखाने या भारतात नांदावेत.' भारतातील सर्व पंथ, आणि संप्रदाय यांच्यात कोणत्याही प्रकारचे मतभेद न उरता त्यात एकी असावी. कोणत्याही धर्माचे कोणीही असो, सगळ्यांच्या वाट्याला स्वातंत्र्याचे सुख लाभू दे, असा वर देवा तू दे. आपल्या सर्व समाजाला मानवता, राष्ट्रभावना नीट कळू दे आणि सर्व ठिकाणी सर्वांच्या मिळून एकात्म भावाने प्रार्थना होऊ दे. नवतरुणांच्या बद्दलही राष्ट्रसंत तुकडोजींच्या बऱ्याच अपेक्षा आहेत. तरुणांसाठी 'ते सतत उद्योगी राहो, सदाचरणी आणि शीलवान नवयुवक असू दे' असे मागणे मागतात. आम्ही परस्परांतील, जाती जातीतील भेदभाव विसरून सगळ्यांनी एक व्हावे. आमच्यामध्ये त्यावेळचा रुजलेला अस्पृश्यतेचा कलंक मूळासकट या जगातून नाहिसा व्हावा. संत ज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणेच त्यांचे हे मागणे आहे की खल, दुष्ट जे आहेत, त्यांच्या मनामनातही परिवर्तन घडून यावे आणि न्यायाने, सत्याने वागण्याची सद्‌बुद्धी ईश्वराने त्यांच्याही मनामध्ये जागृत करावी. 'जे खळांची व्यंकटी सांडो' यातील आशय हाच ज्ञानेश्वरमाऊलीने प्रगट केला आहे.

याही पुढे संत तुकडोजीचे मागणे आहे की, तुमच्या आमच्या प्रत्येकाच्या घरात स्वर्गीय सौंदर्य अवतरावे त्यातच सगळ्यांनी रमावे, रंगून जावे. आपल्या मनात संकटांची जी भीती दडलेली

आहे. सतत भयाची भावना मनाला घाबरविते ती पूर्णतः नष्ट व्हावी. माणसाने परमेश्वराच्या ठायी मन, चित्त एकाग्र करून राहावे. परमेश्वराच्या सेवेत माझे मन वसू दे हीच त्यांची देवाजवळ प्रार्थना आहे. हृदय मंदिरात ज्ञान दिवा पाजळावा. आणि शेवटी बोध होतो.

*'तू सर्वसाक्षि हे कळले, तुजचि श्रीधरा।*
तुकड्याची आस ही पुरवी, देई दर्शना।।

■ ■ ■

## ग्रामगीता सांगणारे राष्ट्रसंत :

संत तुकडोजी महाराजांनी अत्यंत साध्या सोप्या ग्रामीण जनतेला सहज समजेल अशा भाषेत ग्रामगीता लिहिली. सुजाण, प्रगल्भ चिंतन साकार करणारी ग्रामगीता ही तुकडोजींच्या सर्वांना प्रेरक ठरलेल्या प्रतिभेचा अपूर्व चमत्कार आहे. आत्मसंयमना-बद्दलचे चिंतन, मार्गदर्शक विचार, तुकडोजींनी ग्रामगीतेतून मांडलेले आहेत. आपला भारत हा खेड्यांचा देश आहे. महात्मा गांधींजींनी या 'खेड्यांकडे चला' हाच दिलेला संदेश आहे. त्या खेड्यांचा विकास झाला की आपोआपच राष्ट्राचा विकास होईल अशी ग्रामविकसनाची कल्पना संत तुकडोजींची होती. भारतीय समाजातील सर्वच घटकांचा विकास कसा होईल या विषयीची काळजी आहोरात्र तुकडोजींना होती. त्यांचे हे चिंतन ग्रामगीतेत मूर्त झाले आहे. ग्रामोन्नती आणि ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा केंद्रबिंदूच होता. भारतातील ग्रामीण, अतिग्रामीण, दुर्गम भागाची तुकडोजींना

पुरतेपणी कल्पना होती. तेथील परिस्थिती आणि वातावरण त्यांनी स्वत: भोगलेले होते. लहानपणी सोसाट्याच्या वादळाने त्याच्या घरावरच छप्पर उडाले आणि नंतर फक्त आकाशाचाच छप्पर त्यांना आयुष्यभर पुरले. त्यामुळे तुकडोजींनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूत आणि अत्यंत मूलगामी विचार केला. या सर्व समस्यांचे स्वरूप जाणून घेतल्यामुळे त्या कशा सोडवाव्यात हेही त्यांनी त्यावरील उपाय योजनांसह मांडले आहे. त्यांच्या या चिंतनात द्रष्टेपणा आहे. तत्काल संदर्भात तर त्यांच्या उपाययोजना उपयुक्त ठरल्याच पण आजही त्या ग्रामीण विकसनकार्यात अत्यंत उपयुक्त ठरल्या आहेत. त्याच मार्गाने आज ग्रामविकास साधण्याचा प्रयत्न आहे. 'ग्रामगीता' या रचनेत तुकडोजी महाराज म्हणतात –

*'संत देहाने भिन्न असती। परि ध्येय धोरणाने अभिन्नस्थिती।।*
*साधने जरी नाना दिसती। तरी सिद्धांत मती सारखी।।'*

ऐहिक आणि पारलौकिक यांचा सुंदर समन्वय या राष्ट्रसंताच्या ग्रामगीता, काव्यात झालेला आहे. गावागावातील ही सर्व जनता निरोगी, धष्टपुष्ट आणि सुखी व्हावी, ऋग्वेदातील या महामंत्राप्रमाणेच संत तुकडोजींनी आचरणात आणण्यासाठी ग्रामगीता लिहिली. आपल्या अर्पणपत्रिकेत दि. २६ ऑगस्ट, १९५५ सालीच त्यांनी ग्रामगीतेत लिहिले आहे..

*'सर्व ग्रामासि सुखी करावे। अन्नवस्त्र पात्रादि द्यावे।*
*परि स्वत: दु:खचि भोगावे। भूषण तुझे ग्रामनाथा।।*
*कष्ट करोनि महाल बांधसी। परि झोपडीही नाही नेटकीसी।*
*स्वातंत्र्याकरिता उडी घेसी। मजा भोगती इतरचि।।*

*ऐशा भोळ्या शंकरासि। सौख्य लाभावे सर्व देशी।*
*मानवाची पूर्णता तुजसी। प्राप्त व्हावी, मना वाटे।।*
*म्हणौनि केली ग्रामगीता। जागृत व्हाया ग्रामदेवता।*

*तुकडोजींचे हेच शेतकऱ्यांबद्दलचे मागणे आहे की,*
*‘तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो। सकळांचे लक्ष तुजकडे वळो।।’*
*मानवतेचे तेज झळझळो। विश्वामाजी या योगे।।*

त्यांची ही ‘ग्रामगीता’, ‘केवळ नाही पारायणासी’ असे तुकडोजींनी कठोरपणाने सांगितले आहे. त्यांनी आपल्या ग्रामगीतेतून लोकांना भोंदूबुवांपासून दूर नेण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण खुळ्या कल्पनांवर कडक ताशेरे ओढले. ग्रामगीता ही या राष्ट्रसंताच्या समग्र तत्त्वज्ञानाचे साररूप आहे. ग्रामविकास कार्याला गती देणारी ही ग्रामगीता अनन्यसाधारण, अद्वितीय आहे. संत तुकडोजींनीच संदेश दिला आहे की, ‘‘आपल्या लोकांचं कर्तव्य हेच असू शकते की ह्या वाङ्मयाला करोडो मुखी व कानी जाऊ द्यावे....’’ त्यांची ही ग्रामगीता जनजागृतीसाठी गावोगावी पोहचविण्याची आज खरी गरज आहे.

*‘घरोघरी चालवाया प्रचार निर्मळ।*
*ग्रामगीता वाचनाचा।।........*

■ ■ ■

## तुकडोजी महाराज आणि महिलोन्नती :

महिलोन्नती हाही संत तुकडोजी महाराजांच्या विचारविश्वाचा एक लक्षणीय पैलू आहे. कुटुंब व्यवस्था, समाजव्यवस्था, राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते, हे त्यांनी आपल्या सुश्राव्य कीर्तनांच्याद्वारे समाजाला पटवून दिले. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे हे कसे अन्यायकारक आहे हे तुकडोजींनी अत्यंत प्रभावीपणे आपल्या ग्रामगीतातून, भजनावलीतून पटवून दिले आहे. दृष्टी परिवर्तन पंचकात महिलोन्नती हे त्यांचे स्वतंत्र अध्याय/प्रकरणच आहे. त्यात त्यांनी 'मातृ-गौरव' ग्रंथातील स्त्रीच्या निषेधाचे कारण आणि मौलिक स्त्री वैशिष्ट्य, स्त्रीयांच्या अनावस्थेत राष्ट्राची दुर्गती आणि स्त्रीसामर्थ्य, समाजाचा महिलांवर अन्याय, स्त्री शिक्षणाची यथार्थ दृष्टी आणि महिला संघटन इत्यादी विषय आलेले आहेत. त्यात त्यांनी प्रारंभीच नमूद केले आहे.

*'ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण। उद्याचे राष्ट्र आजचे संतान।*
*यासाठी आदर्श पाहिजे गुरुजन। राष्ट्र निर्माते।।१।।*
*विद्यागुरुहूनही थोर। आदर्श मातेचे उपकार।*
*गर्भापासोनि तिचे संस्कार। बालकांवरि।।२।।*
*जिच्या हाती पाळण्याची दोरी। तीच जगाते उद्धरी।*
*ऐसी वर्णिली मातेची थोरी। शेकडो गुरुहूनही।।३।।*

आईच्या स्वभावातूनच पुत्राची घडण होते, मुलांचे वर्णन तेजस्वी आणि उज्ज्वल ठेवते ती आईच. पुरुषांचे मोठेपण सुद्धा स्त्रीच्या तेजावरच अवलंबून असते. मुलांच्या चारित्र्याचे

संगोपन ही माऊलीच करीत असते. ती घर सांभाळते. म्हणूनच वेदाने 'मातृदेवोभव।' असा तिचा गौरव केला आहे. भक्त प्रल्हादाची आई - कयाधु, रामाची माता कौसल्या, कृष्णाची देवकी आणि छत्रपती शिवाजी महाराजांची जिजामाता गौरवार्ह आहेत. पुरुष जेव्हा चिंतातूर तेव्हाच घरची लक्ष्मी विचार करून सांगते. त्याला तारते. यास्तव स्त्रियांना सुशिक्षित आणि पूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांचा व्यक्तित्व विकास घडवून आणावा असे संत तुकडोजींचे म्हणणे आहे. स्त्रीयांचे जीवन, पुरुषांनी रुक्ष करू नये. तिलाही पुरुषांप्रमाणेच पूर्ण मोकळिक असावी. 'चूल आणि मूल' हा काळ संपवून टाकावा. विधवा स्त्रियांचे पुनर्वसन करावे. असे अत्यंत पुरोगामी विचार त्यांनी मांडलेले आहेत. सर्व समाजाने मुलींना उत्तम शिकविणे हा त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे. अत्यंत चकित करणारी ही त्यांची आधुनिक विचारसरणी आहे. ते म्हणतात -

*'म्हणोनि रथाची दोन्ही चाके। मजबूत करावी कातोनि सारखे।।*
*तरीच संसारगाडी सुखे। सुखावेल ग्रामजीवनाची।।'*

असा हा आजच्या काळासही अत्यंत उपयुक्त विचार संत तुकडोजींनी मांडला आहे. तुकडोजी महाराज प्राचीन संस्कृतीचे जसे अभिमानी होते तसेच अद्ययावत शास्त्रीय दृष्टिकोणाचेही पुरस्कर्ते होते. महिलोन्नती जागृती कार्य त्यांच्या ग्रामगीतेने केले. सर्वसामान्य जनतेला उपयुक्त असा हा ग्रंथ आहे. तो लिहून लोकसेवेचे महनीय कार्य त्यांनी केले. म्हणूनच तुकडोजींची 'ग्रामगीता' सर्वसाधारण जनतेची भगवद्गीता झाली आहे.

साधुत्वशक्तीला येथे साहित्य शक्तीची आणि नवीन युगातील नव्या विचारांची जोड लाभली आहे. आपली वाणी आणि लेखणी, शक्ती आणि भक्ती याचे सर्व सामर्थ्य एकवटून त्यांनी सामाजिक जागृतीचे आणि समाजाच्या प्रगतीचे प्रयत्न परोपरीने केलेले दिसतात. मरगळलेल्या ग्रामीण जीवनात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य त्यांच्या ग्रामगीतेने केले आहे. 'उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकड्या म्हणे।' 'सर्वचि कामे मूल्यवान आहेत.' त्यात महिला उन्नतीच्या कार्याला विशेष प्राधान्य आहे.

■ ■ ■

## समाज समरस राष्ट्रसंत :

*'गावागावासी जागवा।*

*भेदभाव हा समूळ मिटवा।*

*उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकड्या म्हणे।।*

हा संदेश सोप्या भाषेत समस्त जनता जनार्दनाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून दिलेला आहे. माणसांना माणूस बनविण्याचा प्रारंभिक प्रयत्न या भगवद्गीतेने केला आहे. कमालीच्या तळमळीतून त्यांनी ग्रामगीता लिहिली आहे. अंत:करणाच्या पीळातूनच असे साहित्य निर्माण होते. या साहित्याने समाजजीवन ढवळून काढले आहे. सर्वसामान्य भिक्षेकऱ्यांच्याही तोंडी तुकड्यादास म्हणे ही भजने सर्वत्र ऐकायला मिळतात, याचे कारण त्यातील मानवतेचा संदेश

देणारा आशय आहे. त्यात सामाजिक समरसता ओतप्रोत भरलेली आहे. म्हणूनच आज खेड्यापाड्यातील बहुजन समाजापर्यंत त्यांची सामाजिक समरसतेची ही हाक पोहोचलेली आहे. हजारो लोकांना आता राष्ट्रसंत तुकडोजींनी या दिशेने कार्यप्रवृत्त केले आहे. ज्याला त्यांचा जीवनग्रंथ म्हणता येईल अशा ग्रामगीतेत सर्वत्र जातिभेद, विषमता, भेदाभेद याचे खंडण महाराजांनी केले आहे. लोकसमाजाचे दोषाविष्करणही निर्भिडपणे केलेले आहे. तुकडोजींनी आधी केले मग सांगितले. त्यामुळे त्यांच्या वाणीला लेखणीला धार प्राप्त झाली. वजन आले आहे. अनुभवातूनच ते येऊ शकते.

ग्रामसफाई, सूतकताई, दवाखाने, शाळा, प्रार्थना इत्यादी अनेक गोष्टींच्या द्वारा त्यांनी ठिकठिकाणी ग्रामांना समाजसेवेचे आणि समरसतेचे वळण लावले आहे. त्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्याची सलग दोन तपे खर्ची घातली आहेत. जपानमध्ये भरलेल्या धर्मपरिषदेतही त्यांनी मानवधर्माची ध्वजा फडकाविली आहे. या ग्रामगीते प्रमाणेच सेनापती बापटांनीही गरजेपोटी 'गावगीता' लिहिलेली आहे. कारण त्यांना 'ग्राम हा विश्वाचा पाया सुंदर' ही बाब पुरतेपणी पटली होती. सगळ्यांना आपली बोली समजावी हा आग्रहही या ग्रामसुधारणा शिकविणाऱ्या गीतेत आहे.

जी व्यक्ती जनसागराचे हृदय आंदोलित करू शकते. तीच देशात अचाट क्रांती घडवून आणू शकते. लोकांचे मतपरिवर्तन आणि मानसिक सुधारणा करण्याची आवश्यकता सामाजिक

समरसतेसाठी असते. ज्यांचे जीवन विश्वाशी समरस झाले आहे. त्यांच्याच शब्दांत एवढे अचाट सामर्थ्य असू शकते. तेच सामर्थ्य राष्ट्रसंत तुकडोजींच्या शब्दांत आहे. ग्रामगीतेत आहे. महाराजांनी खेडेगावातील जीवनाचा गाभाच आत्मसात केला आहे. ग्रामीण समाजातील चांगल्या वाईट गोष्टी, त्यांची बलस्थाने, त्यांचा दुबळेपणा या सगळ्यांचा अनुभव घेऊन वात्सल्यपूर्ण वाणीने त्यांना समाजातील सर्व भेदाभेद विसरून जीवन यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. लोकांचे जीवन विशुद्ध करण्याची तळमळ त्यांच्या उपदेशात आहे. त्यांच्या शिकवणुकीत स्पष्टपणा आहे.

*'खरे नाम, निष्काम ही ग्रामसेवा।*
*झटू सर्वभावे करू स्वर्ग गावा।।*
*कळो हे वळो, देह कार्यी पडू दे।*
*घडू दे प्रभो। एवढे घडू दे।।'*

'समाजाच्या उन्नतीचे सूत्र। खंडू न द्यावे सर्वत्र' हेच महाराजांचे सांगणे आहे. ग्रामसेवा म्हणजे विश्वात्म्यांची सेवा, कारण गाव हा विश्वाचा लहान भाग आहे. महाराज स्पष्ट शब्दांत सांगतात की –

*ग्रामगीता नव्हे पारायणासि। वाचता वाट दावी जनांसि।*
*समूळ बदलची जीवनासी। मनी घेता अर्थ तिचा।।'*
*मग संकल्पावे कार्याचे साधन। ग्राम स्वर्ग करावया।।*

सर्व भूत प्राणी मनुष्यामात्राचे हित, ध्येय डोळ्यांसमोर ठेवून सगळ्यांच्या कल्याणाकरता अनासक्त भावनेने कोणत्याही

फलाची अपेक्षा न ठेवता निष्कामपणाने, निरपेक्ष, निस्पृह भावनेने कर्म हीच केवढी - जनसामान्यांची सेवा होय.

*“खरी सेवा निष्काम धर्म।*
*परस्परांच्या सुखाचे वर्म।*
*समजोनि करील जो त्याग उद्यम।*
*तोचि सेवाभाव समजावा।।”*

राष्ट्रसंत म्हणतात :

*“सर्व मिळोनि एकत्र राहावे।*
*सर्वांनी सर्वांस चालवावे।।*
*सर्व भूतहित रत व्हावे।*
*ऐसे वचन गीतेचे।। (३८-२०)*

हीच व्यापक सामाजिक समरसतेची भावना संत तुकडोजी महाराजांनी प्रत्यक्षात समाजात रुजविली.

■ ■ ■

## ग्रामजीवनाचे पुनर्घटन :

राष्ट्रसंत तुकडोजींच्या ‘ग्रामगीता’ या पांडुरंगाच्या प्रेरणेने, मोठ्या आत्मविश्वासाने ‘पंढरी’ येथे लिहिलेल्या काव्यमय ओवीबद्ध ग्रंथात ग्रामजीवनाच्या पुनर्घटनाचा विचार अत्यंत सखोल स्वरूपात केलेला आहे. अगदी बारिकसारिक बाबतीतही ध्येयवादाच्या दिशेने आणि आशावादी भूमिकेतून ग्रामोन्नतीचा विषय या ग्रामगीतेत मांडला आहे. समाजसुधारक या नात्याने महाराजांना जे सूचवावासे वाटले ते त्यांनी विनासंकोच,

कोणताही आडपडदा न ठेवता प्रतिपादिले आहे. अलक्षित झोपी गेलेल्या ग्रामीण समाजाला जागवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अडाणीपणा, लोकसमजुती, रुढी आणि सामाजिक जडत्व यामुळे गावागावाच्या जीवनात जी अवकळा आली आहे ती नष्ट करावी. खेडूतांच्या मनात अनेकविध सुधारणा घडून याव्यात, त्यांची जीवने सुखी व्हावीत. त्यांच्या ग्लानी आलेल्या, मरगळलेल्या जीवनात नवचैतन्य फुलावे यास्तव राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अंतःकरण सदैव तळमळत होते. ग्रामगीतेतून, त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रगट होणारा जिव्हाळा ग्रामीण जनतेची हृदये हलवून त्यांच्या जीवनाला नवा उजळा देणारा आहे. आज ग्रामीण भागात सर्वत्र बुद्धिभेद केला जातो. तेव्हा व्यक्तीची, आपण वावरतो त्या समाजाबद्दलची जबाबदारी नेमकी काय आहे हे या ग्रामगीतेत सांगितले आहे. केवळ वितंडवाद न माजवता आपण प्रत्यक्ष आचरण करून समाजोन्नती घडवून आणली पाहिजे. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' आणि त्याही पुढे जाऊन लोकानुकंपाय सर्वत्र संचार समाजात असला पाहिजे. नुसता तात्त्विक कीस न पाडता, ब्रह्मवादी न बनता आपण व्रती बनून, निष्ठावंत सेवक बनून ग्रामोद्धार करावा.

ग्रामगीतेत रसाळ भाषाशैलीत मार्मिक वर्णने आणि अतिशय सुंदर विवेचन जागोजाग आले आहे. उदा.

*जैसी नदी सागराशी मिळे। सोडोनि भेदभाव कष्ट बळे।*
*तिचे कार्यचि होते सगळे। मिळण्यासाठी सागरी।।*

त्यांचे विचार प्रगतीशील आणि पुरोगामी आहेत याची साक्ष ग्रामगीतेत सर्वत्र पटते. मृतांच्या अंत्यसंस्कारासाठी कर्जबाजारी होऊ नये. वंचित माणूस हा आज अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन या सर्व गोष्टींपासून दूर आहे, मग हे कर्मकांडाचे थोतांड कशाला?

*'मृत शरीरास पीतांबर। घरी नसल्यास विका घर।*
*दुःख भोगा जन्मभर। ऐसे कोणी न करावे।।*
*असेल तैसेचि वागावे। जुनेही वस्त्र स्वच्छ करावे।*
*खुशाल अंगी बांधोनी न्यावे। मृताचिया गरिबांनी।।*
*नवेचिवस्त्र पाहिजे आणिले। ऐसे शास्त्राने जरी सांगितले।।*
*तरी आमुच्या घरचे कैसे चाले। नाही ठाऊके शास्त्राशी।।'*

ही ग्रामगीता नावाप्रमाणे जरी खेड्यासाठी असली तरी शहरी जीवनालाही ती मार्ग दाखविते. या ग्रामगीतेची शिकवण म्हणजे मनुष्य जीवन एकाकी, एकेकट्याचे नसते. तसे ते राहूही शकत नाही. त्याला परस्पर पूरक होऊन समाजात वावरावे लागते. त्यासाठी समरसता समता-एकता भावाची गरज समाजाला असते. बहुजन समाजासाठीच तुकडोजींची ही रचना आहे. एका अत्यल्पशिक्षित महापुरुषाने ग्रामोन्नतीसाठी लिहिलेल्या या हजारो ओव्या म्हणजे मराठी साहित्यातील एक आश्चर्य आहे. विशेष म्हणजे त्यात प्रतिगामीपणा, बुरसटलेपणा विचारांचा नाही.

*'आम्ही आपुल्यासाठी मरतो। देव सकळांसाठी कार्य करतो।*
*हाचिभाव त्याने स्फुरतो। म्हणोनि धरिला देव चित्ती।।'*
*त्यांची अस्तिक्याची पुरोगामी कल्पना अप्रतिम आहे.*

*'आमची संपत्ती नसे आमची। आमची संतती नसे आमची।।*
*कर्तव्य शक्तीही नसे आमची। व्यक्तिश: उपभोगार्थ।।*
*हे सारे गावाचे धन। असो काया वाचा बुद्धी प्राण।*
*ऐसे असे जयाचे धोरण। तो नास्तिकही प्रिय आम्हां।*
*तो तत्त्वत: नास्तिकचि नोहे। जो सर्वांशी सुखविताहे।*
*तो देवदेव जरी न गाये। तरी देव सेवाचित्तया घडे।।*


■ ■ ■

## देव म्हणजे घेवचि नोहे :

'देव म्हणजे देवचि आहे.' देव, ईश्वर म्हणजे काहीही न घेणारा आहे. देव याचा अर्थ 'देव', 'द्यावे' असाच. संत तुकडोजी 'देव' शब्दावर कोटी करून अर्थ लावतात. समाजाला द्या, गावाला द्या, हेच देणे त्यांना अभिप्रेत आहे. ते स्वत:ला तुकड्यादास म्हणवितात. समर्थ रामदास ही स्वत:ला 'दास'च म्हणवित असत. अचेतन समाजाला 'दासबोध' लिहून समर्थ रामदासांनी जागविले तद्वतच राष्ट्रसंतच म्हणविल्या जाणाऱ्या संत तुकड्यादास यांनीही त्याच धाटणीची आणि त्याच धरतीवर आपली 'ग्रामगीता' लिहिली. त्यांनी खेडेगावात आणि त्या निमित्ताने शहरातही जागृती केली. त्यांना सर्वच संतांबद्दल कमालीचा आदरभाव आहे. तो त्यांनी ग्रामगीतेतून आणि आपल्या भजनावलीतूनही जागोजाग प्रगट केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या ग्रामगीतेत –

*'साधुसंत देवधर्म। मानवोद्धारचि त्यांचे कर्म।*
*तेचि आठवूनि उद्धरु ग्राम। तुकड्या म्हणे।*

हा स्पष्ट उल्लेख आहे. समर्थ रामदास स्वामी संत सावता महाराज, श्रीमत स्वामी वासुदेवानंद सरस्वती, श्रीमत स्वामी रामतीर्थ, आचार्य विनोबा भावे, महात्मा ज्योतिराव फुले, भगवान गौतमबुद्ध, श्रीसंत दामाजी महाराज, श्रीगुरुगोविंदसिंह, श्रीतुकाराम महाराज, वैराग्यमूर्ती श्री गाडगे महाराज, योगीराज श्री सीतारामदास महाराज, श्रीचक्रधरस्वामी, श्रीगुरुश्रीपाद, श्रीवल्लभस्वामी, भगवान महावीर स्वामी, श्रीगुरुनानकदेव, श्रीसंत गोरा कुंभार, पूज्य श्री सानेगुरुजी, मायदेवी मंजुळा देवी, श्रीसंत एकनाथ महाराज, श्रीसंत कबीरदासजी, श्री लोकमान्य टिळक, श्रीमत् स्वामी दयानंद सरस्वती, श्रीमत आद्य शंकराचार्य, स्वामी रामकृष्ण परमहंस, प्रेममूर्ती प्रभू येशू ख्रिस्त, श्रीसंतसाईबाबा, श्रीसंत चोखामेळा महाराज, भक्तिमयी मीराबाई, श्रीसंत चैतन्य महाप्रभू, संतमूर्ती श्रीरमणमहर्षी, श्रीसंत गोस्वामी, तुलसीदासजी श्रीसंत गुलाबराव महाराज, श्रीसंत



सूरदास–महाराज, योगीराज श्री अरविंदबाबू, श्रीसमर्थ अडकोजी महाराज, पूज्य महात्मा गांधी, श्रीमत् स्वामी विवेकानंद, श्रीगुरु ज्ञानेश्वर महाराज, श्रीसंत नामदेव महाराज या सर्वंच संतांचे उल्लेख, प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे संत तुकडोजींच्या ग्रामगीतेत आले आहेत. याचा अर्थ त्यांनी या सर्व साधू संत महात्म्यांच्या चरित्राचे अवगाहन केले होते. चिंतन केले होते. म्हणूनच त्यांचे उल्लेख तर आलेच पण तुकडोजींच्या व्यक्तिमत्वात प्रगल्भता, अनुभव संपन्नता अवतरलेली दिसते. समृद्ध अनुभवाची परिपक्व अभिव्यक्ती ही त्यांची 'ग्रामगीता' या महामानवांच्या विषयीच्या श्रद्धेने बनली.

*'संत महात्म्यांचे हृदगत। देवाचा शुभ सृष्टी संकेत।।*
*विशद कराया सरळ भाषेत। सुखसंवाद आरंभिला।।*
*स्त्रिया, मुलेही होतील आदर्श। पूर्ण हा ग्रंथ घरी होता पठण।।*
*ग्राम होईल वैकुंठ भुवन। वाचता वर्तता ग्रामगीता।।*

स्वतः संत तुकडोजी महाराजांनीच हे नमूद केलेले आहे. या ग्रंथाच्या अंमलबजावणीने नक्कीच खेडी उजळतील. या प्रासादिक वाणीने बहुजन समाजाचा उत्कर्ष घडून येईल. असंख्य जणांवर याचा प्रभाव अवश्य पडेल. त्यांच्या प्रेरणेने जागोजाग गुरुदेव सेवा आश्रम उभारले. 'मोझरी' येथील, त्याचप्रमाणे विदर्भ, नागपूर भागातील या आश्रमांत सर्व साधूसंतांच्या प्रतिमा विराजमान झालेल्या दिसतात. याचे कारण त्यांच्याविषयी संत तुकडोजींची अपार भक्ती. भावना हेच होय. आज अत्यंत दुर्लक्षित दुःखी जीवन म्हणजे खेड्यातील जीवन. त्या दुःखाचा परिहार कसा होईल ही आपली समस्या म्हणूनच तुकडोजी

महाराजांनी अचूकपणे ग्रामावरच आपले लक्ष केंद्रित करून सर्व काही देण्यासाठी, सर्वस्व अर्पण करण्यासाठी, सेवेसाठी ही 'ग्रामगीता' साकार केली.

■ ■ ■

## लोकजागृतीचा अरुणोदय :

*'उठा गड्या। अरुणोदय झाला श्रीसद्गुरुच्या ज्ञानाचा।*
*सोडा काम विकार बिछाना, नाश करा अज्ञानाचा।।'*

बाल्यावस्थेच्या कालातील वंदनीय संत तुकडोजी महाराजांची ही रचना आहे. ही रचना साधीसुधी बाळबोध वाटली तरी भावी कालखंडातील ज्या रचना झाल्या त्या म्हणजेच लोकजागृतीचा अरुणोदय होय. त्यांची भजने खंजिरीवर गाजायची आणि भक्तजन भक्तिभावाने, ती लिहून ठेवायची त्यातून भजनावली पुस्तिका संग्रहित झाल्या आहेत. लेखनिकांविषयी कृतज्ञता महाराजांनी –

*'ऐदीनारायण आमुचा स्वभाव। परी बापूराव पाळी आम्हां।'*

या शब्दांत गमतीदारपणाने व्यक्त केली आहे. बापूराव पाटील त्यांचे लेखनकर्ते होते. बालमित्र होते. त्यांच्या भजनांच्या वहीत स्वतः तुकडोजी महाराजांचे हस्ताक्षर, आढळते. तरुण वयातील त्यांच्या या रचना असल्याने काही ठिकाणी 'माणिक म्हणे' असे उल्लेखही आलेले आहेत. 'मायबाप रागावती' असेही त्यात म्हटलेले आहे. त्याचप्रमाणे 'वय हे गेले सतराचे, झाले तुकडे धैर्याचे' असा वय वर्ष १७ असल्याचा निर्वाळा आलेला आहे. याही वयात या राष्ट्रसंतांच्या काव्यात

आर्तता, अनुताप, दर्शनोत्कंठा, हटयोग, राजयोग, विहंगममार्ग, अजपा, अनाहतध्वनी, मुद्रा, चक्रभेदन, तत्त्वमसि, महावाक्य ॐ तत्सत् इत्यादी वर्णने आणि अधिकारवाणीचा रोकडा उपदेश हे सारे काही स्तिमित करणारे अवतरलेले आहे. विविध पंथोपपंथ, धर्म आणि देवदेवता यातील समसमान भाव, आत्यंतिक गुरुनिष्ठा, देवदेवतांमध्येही सद्गुरुचे होणारे दर्शन, हेही विषय या भजनावलीत आलेले आहेत.

*''झटकन् उठूनी पटकन लागे सहजसमाधी हो।*
*आनंदे डुलतसे, खावया मिळती मोती हो''*

या अनुभूतीची प्रचीती त्यांना आलेली आढळते.

*'आडकुजी - चरणांनी गेले कितितरि पुढेहि जातील।*
*धर्मकलियुगी हाची, तरेल भवि जो धुळीच लावील।।*

आपल्या संदेशात तुकडोजींनी नेहमीच कमालीची नम्रता, विनयशीलता, अमानित्व धारण केले आहे. ते म्हणतात, 'आमचा बालपणचा वेडेपणा, ती अध्यात्मिक धारेतली मस्ती, चुकल्या माकल्या शब्दांत आपणासमोर येत आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित या भजनांमधून प्रभावीपणे मानवी जीवनाला सर्वांगीण मार्गदर्शन लाभले आहे. लोकांनी ही लोकभजने गाताना, त्याच्या अर्थबोधाशी समरस व्हावे. ही महाराजांची अपेक्षा आहे. लोकांना ते म्हणतात, ''वाचा, आचरा. देशाचा उद्धार करा आणि आत्मवान बना.'' तर 'क्रांतिवीणा' मधून तुकडोजी महाराजांनी देशभक्तास, देवभक्तास, अबला महिलेस, श्रीमंत धनिकास, व्यसनी

तरुणास, विद्वानास अशा सर्वांना स्वधर्माची जाणीव करून दिली आहे. क्रांतीचा अर्थ रक्तपात नसून त्याग, सेवा, सत्य, प्रेम, अहिंसा आहे. ही क्रांतीची शाश्वत मूल्ये त्यांनी मानली आहेत. क्रांतीची ही एक जागती मशाल बनली आहे. क्रांती ही विध्वंसासाठी नाही, तर शांती प्राप्त व्हावी म्हणून करायवाची असते. परिवर्तन म्हणजेच क्रांती. समाजाच्या अध:पतनाची कारणे नष्ट करणे, समाजव्यवस्थेत उत्कर्ष व सुखशांतीसाठी परिवर्तन घडवून आणणे आणि आवश्यक गोष्टींचे नवनिर्माण गरजेसाठी करणे यात क्रांती आशय आहे. तुकडोजी संदेश देतात, 'आमची क्रांती ही वीणा बनली पाहिजे. खंजीर किंवा बॉम्ब नव्हे.' वीणा आपल्या झंकाराने विषारी सर्पालाही वश करू शकते. वीणेच्या प्रभावी स्वरांनी अंधारात दीप उजळतो. अंत:करणातल्या परमेश्वराला जागवून स्वर्गात जगाला 'वीणा' बदलवू शकते. अशा या प्रत्येक भजनातील वीणेचा झंकार जनतेच्या हृदयात निनादत आहे. संत तुकडोजी महाराज म्हणतात.

*'नव-क्रांतीची वीणा मंजूळ वाजे रे,*
*'तुकड्यादास गमे युगधर्मचि हा साजे रे'*
*आम्ही क्रांतीचे वीर गडी रे। सरळ करूं बिघडली घडी।।धृ।।*
*आमुची क्रांती शांति शिकविते, प्रतीक त्याचे वीणा चिपळी।।*

दृष्टीत दिव्यता आली की, त्या दिव्यदृष्टीने ईश्वराचे विश्वदर्शन होते. विश्वाच्या विशालतेत जीवाचे विलीनीकरण झाल्यानेच मग ''सर्वभूतमात्र मीच'' असा अनुभव येतो. जगती

जनार्दन व्यापला' ''कर्तव्य ही पूजा प्रभूची'' ''विश्व हे घर अपुले' असा प्रत्यय येतो.

*''विश्वचि घर भासूनि, जीव हा होत सदा दंग।*
*प्रगटतो भक्तीचा रंग। असा हा संतांचा संग।।*

■ ■ ■

## 'सुखाचा मार्ग जगाला पावो' :

साधकाच्या मनात भक्तीची ज्योत, माणसाच्या मनातील भावभावनांना ईश्वरीशक्तीचा वरदहस्त लाभावा, त्या दैवीशक्तीचे मार्गदर्शन लाभावे म्हणून सतत तेवत ठेवली पाहिजे. युगायुगानुसार साधुसंतांनी धर्ममार्ग भाविकांच्यासाठी आखून दिलेले असतात. त्याला मात्र भाविकांची श्रद्धा, प्रेम आणि आचरणाची जोड असली पाहिजे. अन्यथा ईश्वराच्या विशुद्ध भूमिकेचे ज्ञान होणार नाही. 'अनुभव सागर' या भजनावलीत संत तुकडोजी महाराजांचा हा संदेश आहे. शब्दांचे सामर्थ्य त्यांनी ओळखले होते. शब्दच दुर्बळाला बलवान आणि अडाण्याला ज्ञानी बनवतात. पण त्यासाठी निर्मळ मन आणि अनुभूतीची जोड शब्दांना असावी.

*'अजित नाम वदो भलत्या मिसे।*
*सकल पातक भस्म करितसे।।*

उपासकांनी हे जाणून आचरण केल्यास वाणीत तेज आणि आत्मबल प्राप्त होईल. ईश्वराच्या आणि भक्ताच्या उत्कट प्रेमभक्तीच्या खुणा असतात. तुम्हाला त्या जाणून घ्याव्या लागतील. तुकडोजी म्हणतात, 'भजन म्हणजे मनाची

ईश्वरविषयक आत्यंतिक तळमळ होय. मग ती कोणत्याही वाद्यांच्या सहाय्याने वा कशाही रुपात प्रगट होवो. म्हणूनच नदीच्या तीरावर दोन गोटे वाजवूनही एखाद्या भक्ताने केलेले भजन देवाला मानवते. उपासकांना उद्देशून राष्ट्रसंत तुकडोजी म्हणतात, 'तुम्ही जर शब्दांकडे अर्थाच्या दृष्टीने व मनाच्या निर्मळ भावनेने पाहू लागलात. तरच तुमच्याकडून भजन होईल व आत्मोन्नतीही साधेल. आणि नंतर अध्यात्ममार्गाचा अनुभव कळू शकेल.' भजन म्हणजे दैवी शक्तीच्या बगीच्यात नेऊन त्यावर भक्तिरूपी सुगंधाचे आवरण घालणे होय.

*'तुकड्या दास म्हणें गुरुदेवा। भक्तिरमो अमुच्या जिवभावा।*
*वीर सदा विजयी हो।। सुखाचा मार्ग जगाला पावो।*
*निर्मळ ज्ञान प्रवाहो।।*

त्याचप्रमाणे,

*सेवाधर्म जिवाचा वाढो। अविचल प्रेम न भू चे खंडो।।*
*ऐक्यपणे प्रभु गावो। सुखाचा मार्ग जगाला पावो।।*

हीच संत तुकडोजी या राष्ट्रसंताची मनोभावना आहे. संत तुकडोजी महाराजांची 'विवेक माधुरी' ही भजनावली विवेक मंथन सादर करणारी आहे. 'विवेक' हे ज्ञानप्राप्तीचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. विचार केल्याशिवाय कोणतीही गोष्ट आकलन होत नाही; कळत नाही. ते म्हणतात,

*''धगधगते ज्वाला त्यागाची।*
*उज्ज्वल ज्योती निज ज्ञानाची।।*
*हाती कमळे जनसेवेची।*
*नित्य शिकविते विचार मंथन।।''*

माणसाजवळ विवेक आला की सर्व तऱ्हेच्या भजनातून सार काढता येते. मग ती भजने, भक्ती ज्ञान, वैराग्य कोणत्याही विषयावरील का असेना, त्या सगळ्यांच्या मधून राष्ट्रीयतेची सहज भावना अभिव्यक्त होते. राष्ट्रीयतेचा स्वर मध्यवर्ती म्हणून आळविला जातो. यातूनच पुढे आत्म्याची आणि मानवतेची विशालता आपल्याला जाणवू लागते. आजच्या युगात विवेकासंबंधी आदर असणे आवश्यभावी आहे. या विवेकातूनच आत्म्याची व्यापक अनुभूती निर्माण होत असते. अशाप्रकारे थोर संतश्रेष्ठांचा विवेक याच माध्यमातून प्रगत होत असल्याने तो सर्वस्पर्शी, परिणामकारक उपकारक ठरतो. श्रीगुरू ज्ञानेश्वरादि संतश्रेष्ठांचा विवेकावरील आदर हा याच कोटीतला आहे. ज्ञानेश्वरमाऊली म्हणते.

*मम हृदयी सद्‌गुरू। जेणे तारिली हा संसारपुरू।*
*म्हणोनि विशेष अत्यादरू। विवेकापरी।*

*(ज्ञानेश्वरी, अ.१ ओवी २२)*

मानवतेची पूर्णता सर्वव्यापी विवेक अनुभवूनच येते. अशाप्रकारे मानवी जीवनाचे शाश्वत व अंतीम मूल्य शोधून काढणाऱ्या या विवेकाची माधुरी काही औरच असते. या भूमिकेवरूनच विवेक माधुरीची रुचि घेणे आवश्यक आहे. असे आपल्या भूमिकेत संत तुकडोजी महाराजांनी प्रतिपादन केले आहे.

*अन्न-वस्त्र दे विद्या बल दे। घरोघरी सुविचार शील दे।।*
*तुकड्यादासा दे पदि ठावा। मंगलकर मंगल देवा।।*

■ ■ ■

## तुकडोजींचे शिक्षण चिंतन :

संत तुकडोजींनी ग्रामगीतेतील एकोणिसावा अध्याय हा जीवन शिक्षण विचाराला वाहिलेला आहे. स्वतः अत्यल्प शिक्षित असूनही इतका मूलगामी आणि मूलभूत शिक्षण विचार त्यांनी केला, याचे आश्चर्य वाटते. अनुभवसंपन्न माणसाचे चिंतन किती प्रगल्भ आणि परिपक्व असू शकते याची प्रचीती आपल्याला येते. संत तुकडोजींना सतत ग्रामसुधारणेची चिंता लागलेली असल्याने त्यांना गावाच्या उपयोगी पडणारे सुशिक्षित नवयुवक घडवावेत असे वाटते. म्हणून ते म्हणतात.

*आदर्श होतील विद्यार्थीगण। गावाचे पालटेल जीवन।*
*कोठेच न उरेल गावंढळपण। टिकाऊ परिवर्तन यामागे।।*
*विद्यामोले ऐसे चढता। येईल भाग्य गावाचे हाता।*
*तुकड्यादास म्हणे तत्त्वता। विसरू नका हा मूलमंत्र।।*
*इतिश्री ग्रामगीता ग्रंथ। गुरु शास्त्र स्वानुभव संमत।*
*कथिला सर्वोन्नतीचा विद्यार्जनपथ।*
*एकोणविसावा अध्याय संपूर्ण।।*

संत तुकडोजींनी शिक्षणाच्या संदर्भात अत्यंत व्यवहार्य, वास्तव, प्रत्यक्षाला धरून विचार केलेला आहे. म्हणून त्यांनी या अध्यायाला 'जीवन-शिक्षण' असेच नाव दिले आहे. त्यांना नुसते शिक्षण अभिप्रेत नाही. तर जीवनाभिमुख प्रत्यक्षात उपयुक्त ठरणारे शिक्षण अपेक्षित आहे. दैनंदिन जीवन जगताना या शिक्षणाचा उपयोग व्हावा. त्याचे चिंतन अनेक परीने त्यांनी केले आहे. आजही त्यांचे हे शिक्षणविषयक विचार

लाभदायक ठरणारेच आहेत. अत्यंत सडेतोडपणाने, रोकठोकपणे त्यांनी शिक्षणाबद्दलचे चिंतन ग्रामगीतेच्या या अध्यायात केलेले आहे. एका अर्थाने जीवन जगण्याच्या दृष्टीने कुचकामी ठरलेल्या आजच्या शिक्षण पद्धतीचा खरपूस समाचार त्यांनी येथे घेतलेला आहे.

शिक्षणाबद्दल आपल्या कशा चुकीच्या कल्पना रुढ आहेत हे त्यांनी प्रारंभी सांगितले आहे. यात शहरातच फक्त उच्च शिक्षण मिळते. 'खेड्यात अशा शिक्षणाचा आणि शिक्षिताचा उपयोग काय?' असा अकारण प्रश्न पडतो. यावर तुकडोजी म्हणतात –

*''दिखाऊ कपडे, कोरडी ऐट। नोकरपेशी थाटमाट।।*
*हे शिक्षणाचे नव्हे उद्दिष्ट। ध्यानी घ्यावे हे नीट ।।५।।*

बाप शेतकरी असतो आणि असा शिकलेला मुलगा नोकरीची वाट पाहतो. जुजबी काम करून खूप पैसा कमावणारा 'बाबूसाहेब' व्हायला पाहतो; पण हे तुकडोजींना देशहिताचे, ग्रामहिताचे वाटत नाही. गावीही राहायला भूषण वाटेल असे शिक्षण पाहिजे. कष्टाळू भारताचे सुपुत्र म्हणून सुशिक्षित तरुण त्यांना अपेक्षित आहेत. त्यांचे म्हणणे असे होते की,

*'शिक्षणातील जीवनाचे काम,*
*दोन्हींची सांगड, उत्तम असली पाहिजे।*

आयुष्य जगताना शिक्षण उपयुक्त हवे.

*जीवनाच्या गरजा संपूर्ण। निर्वाहाचे एकेक साधन।।*
*संबंधित विषयांचे समग्रज्ञान। यांचा अंतर्भाव शिक्षणी।।*

संकटकाळी उपयुक्त ठरणारे, दैनंदिन जीवनात लाभदायक, शिक्षण असावे अन्यथा ती विद्याचातुरी उपयोगाची नव्हे.

*'विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय।*
*शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन जय करावया।।*
*यासाठी शिक्षण घेणे। की जीवन जगता यावे सुंदरपणे।।'*

वेळप्रसंगी धडाडीने प्रतिकार करणारी बलोपासक मुले शिक्षणाने घडावीत. पूर्वीच्या गुरुकुल ऋषिकालीन शिक्षणात हीच जीवन संथा शिकवण विद्यार्थ्यांना मिळत असे. चौदा विद्या आणि चौसष्ट कला या शिक्षणात समाविष्ट होत्या. उच्चशिक्षण खेड्यातच उपलब्ध झाले पाहिजे. आदर्श गाव निर्माण करणारे, सहकार्य देणारे, परस्परांना पूरक बनविणारे, जनसेवेचे प्रमाणपत्र प्राप्त करून देणारे, शिक्षण विद्यागुरूंनी द्यावे. शिक्षकांनी जबाबदारी ओळखून शिक्षण दिल्यास गाव सुधारेल. श्रमाची प्रतिष्ठा वाढेल. कोणत्याही कामाची लाज वाटणार नाही. याला जीवन विकासाचे शिक्षण तुकडोजी म्हणतात. जीवन शिक्षणाचे गठबंधन व्हावे. विद्यार्थ्यांना तो ज्यात पारंगत होऊ इच्छित असेल ते शिक्षण घेऊ द्यावे तो पुढे

*ज्यात दिसे निष्णात। त्या विद्येचा घेऊ द्यावा अंत।।*

■ ■ ■

गहिवरल्या कंठातून, वाहत्या नयनधारांतून संत तुकडोजी महाराज म्हणतात,

*"गोविंद म्हणा गोविंद। अवघेची धरा छंद।।*
*'अनुभवची संत स्वच्छंद। तुझ्या स्वरुपी सदा आनंद।।"*

सर्व भेदभाव विसरून, बंधन विसरून आपण हरिस्मरणात गढून जावे. मोहमाया भावना विषयवासना नाहिशी झाली असा हा सुखद स्वानंदाचा अनुभव, संत तुकडोजी महाराजांनी मुक्त मनाने अनुभवलेला भजनांमध्ये दिसून येतो. विशेष म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मराठीप्रमाणेच हिंदी भाषेवरही प्रभुत्व आहे. म्हणून त्यांची हिंदी भजनावलींचीही एकूण २६ पुस्तके उपलब्ध आहेत. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विरचित ज्ञान-दीप नावाचे २ भजनावली संग्रह, त्याचप्रमाणे भक्तिसुधा, वाचा-वल्ली, सुधा-सिंधू, आत्मप्रभा इ. काव्यपुस्तिका हिंदीत उपलब्ध आहेत.

*'कधी येशील मनमोहना। घे धाव नंद नंदना।।'*

या भजनात मनमोहनाला भारत देश पाहण्यासाठी संत तुकडोजी पाचारण करतात. सगळी बंधने तोडून टाक आणि गरुडावर स्वार होऊन गरुडभरारी मार. श्रेष्ठ भक्तीचा रंग प्रगटवणारा हा सत्संग आहे. भक्त देवाच्या सेवेत इतके दंग होतात, की ते ब्रह्मच त्यांचे अंगांग होऊन जाते. सगळा अहंकार गळून पडतो. लोभ नाहिसा होतो. प्रेमाची भांग एकदा चढली की

मरणाचे दुःखही नाहिसे होते, सौख्याचे राज्य प्राप्त होते.

*'विश्वची घर भासूनी। जीव हा होत सदा दंग।'*

शेवटी 'तुकड्या म्हणे नुरे व्यंग' अशी उन्मनी अवस्था प्राप्त होते. या कार्याच्या प्रसार प्रचारासाठी त्यांनी 'गुरुदेव सेवा मंडळाचे जाळे उभारले होते. 'मोझरी' चा आश्रम त्याचप्रमाणे नागपूर जवळील काटोल रस्त्यावरील 'मानव मंदिर' तुकडोजींच्या कार्याचा लौकिक वाहवीत आहेत. याच आश्रम, मंडळ, मंदिरांच्या माध्यमातून तुकडोजींनी स्वातंत्र्यपूर्व काळात समाजप्रबोधनाबरोबरच राष्ट्रप्रेम जागविले. महात्मा गांधींच्या आश्रमातही त्यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात आपल्या भजनांची सामुदायिक प्रार्थनेला जोड दिली. राष्ट्रीय विचारसरणीने भारलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होते.

समाजजागृतीसाठी त्यांच्या कार्याला आणि वाणीला बहर आलेला आहे.

*''प्यारा हिंदुस्थान है। गोपालो की शान है।।*
*वीरोंका मैदान है। उसमें भक्तों के भगवान है।।*

असा पुकार करून त्यांनी समाजाला आदेश दिला की 'आझाद करो दिल को अपनें, जो सूरज का प्रकाश करे।।'

१९३६ ते १९४२ च्या कालखंडात संत तुकडोजी महाराजांच्या खंजिरीने भारतीय जनतेत राष्ट्रभक्तीभाव जागविला. लोकांना त्यांनी हिंदी काव्यातून सवाल केला आहे.

*'हिंदूभूमी के पुत्रो तुम्हारे मुखमंडल ऐसे निस्तेज क्यों?*
*उठो जवानो करके बनावो, अब कहने के दिन गये।'*

*'शेर हो तो चलो राह भी शेर की।*
*कहे ते हो शेर तो। तो रीत क्यों भेड की?'*

असा रोकडा, खडा सवाल त्यांनी जवानांना, तरुणांना विचारला आहे. इंग्रज सावध झाले, त्यांच्याविरुद्ध तुकडोजी रान उठवीत होते म्हणून २८ ऑगस्ट, १९४२ ला तुकडोजी महाराजांना तुरुंगात टाकण्यात आले. ७४ दिवस त्यांना कारावासात ठेवले. पण नागपूर विदर्भ जनता खवळून उठली. कारागृहाला तुकडोजी 'श्रीकृष्ण मंदिर' म्हणत.

तुकडोजींचे जीवन विषयक चिंतनही मोलाचे आहे.

*'संसाराचा बोझ वाहता। टेकलासे मरणाला, नेसी साथी कुणाला।' 'आसक्तीचा बंध तोडून, तू देवाची लीला बघ।,* सरणाच्या वाटेवर माणूस सहज चालता चालता केव्हा पोहचतो तेही कळत नाही, म्हणून गरिबांची जाणीव ठेवावी. सत्संग, दान, धर्म या गोष्टींना आयुष्यात महत्त्व द्यावे. षड्रिपूंच्या मेळ्यात आपण अडकून न पडता भक्तीचाच आधार खरा हे लक्षात घ्यावे. म्हणून ते कळवळून सांगतात –

*ऐका हा भाव जीवाचा। भक्तीविणा उद्धार नाही कुणाचा।*
*तुकड्या दास म्हणे ऐका ना। नित्य प्रभूचे भजन करा ना।*
*व्यसने सगळी सोडूनी द्या ना।*
*सरळपणाने जीवन जगा ना। लोभ करा सर्वांचा।....*

दुसऱ्या एका भजनात ते म्हणतात.....

*कां भ्रमलासी, कां भ्रमलासी। जा शरण गुरुपायासी।।*

हाच त्यांचा आपण संदेश काळजात जपून ठेवावा असा आहे.

■ ■ ■

## उपासकांना मौलिक संदेश :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भजनाच्या संदर्भातील मनोभावना भजन, गाणाऱ्यांनी आवर्जून समजून घ्यावी. तरच तुमच्या ईश्वरभजनाचे सार्थक होईल.

तुकडोजी महाराज म्हणतात,

*'सुखाचा मार्ग, जगाला पावो, निर्मळ ज्ञान, प्रवाहो,*
*तुकड्यादास म्हणे, गुरुदेवा।*
*भक्ति रमो, आमुच्या, जीवाभावा।*
*वीर सदा विजयी हो। आणि 'सुखाचा मार्ग जगाला पावो।।'*

उपासकांनी, जर शब्दाशब्दांकडे, अर्थाच्या दृष्टीने पाहिले मनाच्या निर्मळ भावनेने पाहिले, तरच तुमच्याकडून खऱ्या अर्थाने भजन होईल. त्यातून तुमचा आत्मोद्धार होईल. आत्मोन्नतीचा हाच खरा धर्म मार्ग आहे. तुम्हांला मग हळूहळू क्रमाने त्यातला अनुभव येईल.

महाराज म्हणतात, "भजन म्हणजे एका दैवीशक्तीच्या बागेमध्ये तुम्हांला विहार करायला लावणं होय, या दैवी शक्तीवर, भक्तिरूपी, सुगंधाचं आवरण घालणं होय. माणसाच्या मनातील विकार त्यामुळं संपतात आणि कळत नकळत विषयवासनेपासून मनुष्य दूर जातो. 'नर करणी करे, तो नरका नारायण होय.' संतांना याच मार्गांनी नराचा नारायण करायचा आहे. हीच त्यांची सोपी पद्धत आहे.

'भजन' म्हणजे, दुसरे तिसरे काही नसून, तुमच्या माझ्या, सर्वांच्या मनामनातील, अंतःकरणातील परमेश्वराबद्दलची

आत्यंतिक तळमळ आहे. मग ही आर्तभावना, भक्तीची भावना, कोणत्याही माध्यमातून का होईना, प्रगट झाली पाहिजे. त्यासाठी तुम्ही कोणते वाद्य हाती घेतले ते महत्त्वाचे नाही, संतांनी भजनी मार्ग हा, सोपा मार्ग काढला आहे. भक्तीच्या खुणा जनसामान्यांना सुलभतेने कळाव्यात. सर्वसामान्य जणांसाठी भक्तिभाव महाग आणि दुर्बोध होऊ नये, यावर संत तुकडोजी महाराजांचा, कटाक्ष होता. या संदर्भात तुकडोजी महाराजांनीच, एक दाखला दिला आहे. मला वाटते, ते उदाहरण पुरेसे बोलके आहे, ते म्हणतात –

'मी, एकदा एका महात्म्याच्या भजनात गेलो. तो नदीच्या तीरावर दोन गोटे (दगडाचे) घेऊन, सारखा, देवाला दूषण देत होता; पण त्याच्या डोळ्यांतून मात्र सतत अश्रूंचे लोंढे वाहत होते. त्याच्या वाणीचे ते शब्द ऐकून मी त्याला विचारले की, 'महाराज! असंच का भजन असते?', यालाच भजन म्हणतात का? तर तो म्हणाला, अरं! तुला जे तसं दिसतं. 'अरं! पती पत्नी यांच्या प्रेमाची भाषा बाहेरच्या लोकांना कशी कळल?, त्याचप्रमाणे ईश्वराच्या आणि भक्तांच्या सुद्धा प्रेमभक्तीच्या अशाच खुणा असतात. तुम्ही भजनात रंगून जा, दंग व्हा' मग तुमच्या अंगी, त्या प्रेमभक्तीच्या खुणा, हळूहळू येतील, आणि मग त्या उलगडतील सुद्धा! यातून तुकडोजी महाराजांनी 'भजनावली'चा हा अगाध महिमा सांगितलेला आहे.

तुमच्या माझ्या मनातील, विभिन्न भावनांना, हा ईश्वराच्या दैवी शक्तीचा मार्ग खुला व्हावा, लाभावा. जीवा शिवाचे मिलन व्हावे, म्हणून भजनांच्या माध्यमातून ही भक्ती भावनेची,

ज्योत साधकाच्या जनसामान्यांच्या मनात रुजविली जाते, जागविली जाते. आजच्या नव्या युगाचा धर्म 'हरिनाम' नामजप "अजित नाम वदो भलत्या मिसे। सकल पातक भस्म करितसे।"

'नावाचे माहात्म्य' हाच मार्ग संतांनी भाविकांच्यासाठी सोपा म्हणून आखून दिला आहे. संत तुकडोजींनी त्याला प्रगाढ श्रद्धा, उत्कट प्रेम आणि सदाचरणाची जोड द्यायला सांगितली आहे. तालासुरांचा कोरडा नाद येथे उपयोगाचा नसतो. तुमच्या जवळ आत्मबल आणि तुमच्या वाणीत तेज पाहिजे. हा तुकडोजी महाराजांच्या उपासकांना मोलाचा संदेश आहे.

■ ■ ■

## संत तुकडोजी महाराजांच्या भजनावली :

*आमुचे प्रेम गुरुपदी राहो।*

*आवडली गुरुमाया, हृदया।*

*आकळावा प्रेम भावे।*

*ऐक रे! सुजना मना।*

*अंतरी इच्छा अशी वाहते सदा रे।*

*काय वर्णु थोरवी गुरूंची।*

*गुरुविण शांति ना मना।*

*गुरुपदि धीर निर्धार।*

*झणि भेट सखया गुरुराया।*

*दृढ धरू गुरूंचे पाय।*

*धन्य सद्गुरुराया।*

*बा सांग सद्‌गुरुराया।*

*भजा भजा गुरुराज।*

*सद्‌गुरुची निजकृपा व्हावया।*

*'सद्‌गुरु नाथा। 'गजानन'।*

*सद्‌गुरुनाथा। करि करुणा रे।*

*सद्‌गुरुराया का रुसला बा।*

*सद्‌गुरु आडकुजी समर्थ।*

*सद्‌गुरुने नवल दावले।।'*

असे हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी, आपल्या अनेक भजनांमधून श्रीसद्‌गुरुंचे सामर्थ्य वर्णन केले आहे. त्यांच्या 'मोझरी' येथील आश्रमाचे नावही 'गुरुकुंज' असेच आहे. श्री सद्‌गुरु 'आडकुजी' समर्थ, हे संत तुकडोजी महाराजांचे गुरु होते. आपल्या एका भजनात तुकडोजी म्हणतात,

*'श्री सद्‌गुरु 'आडकुजी' समर्था। किती आळवू तुला।*

*प्राण सद्‌गदित कंठि जाहला।।*

असे ते कळवळून म्हणतात, आपल्या गुरुचे चरित्रच ते वर्णन करतात.

*'गाता तव महिमा न पुरे ना। जन्म नराचा खरा।*

अल्पमति, गाती तुज सुरवरा। हाच श्रद्धा भाव, त्यांनी सद्‌गुरुनाथ शेगावच्या गजानन महाराजांबद्दलच्या एका भजनातूनही अभिव्यक्त केला आहे.

*'श्री सद्‌गुरुने नवल दाविले, न पाहवे, मज डोळा रे।'*

*डोळियावाचुनि, दृश्य प्रगटले, उंच दाविला, माळा रे।।*

एक वेगळीच प्रचीती या सद्गुरू भजनावलीत आपल्याला येते. डोळ्यावाचून दृश्य पाहिल्याची ही अनुभूती आहे. दुसऱ्या एका भजनात सद्गुरु आपल्यावर रुसल्याची कल्पना त्यांनी केली. ते कीव भाकून म्हणतात, 'सद्गुरुराया! का रुसला बा, हीन दीन लेकरा?' मी तुझा महिमा ऐकून, तुझ्या जवळ घाबरा होऊन आलो आहे. प्रपंचातील अशांतता, आणि महाकठीण धारेचा, प्रत्यय मला आला आहे. त्यामुळे मला शांतता मिळत नाही, काम क्रोधांच्या उफाळणाऱ्या लाटांवर, आशा तृष्णांच्या गराड्यात मी सापडलो आहे. सत्संगतीची, माझ्या जीवाला ओढ लागलेली आहे. ही तळमळ व्यक्त करतांना, ते म्हणतात -

*'का बघसी मम अंत, दयाळा? दे भक्तीचा झरा।*

*तुकड्यादासा - तुझा भरवसा, अन्य नसे दुसरा।।*

सद्गुरू कृपेचे महत्त्व, संत तुकडोजी महाराजांनी पुरतेपणी जाणले होते. 'तोचि खरा रे। तो चि खरा, अव-तारु जनतेचा।' ही त्यांची श्रद्धा होती. निश्चयाचा, गुरुभक्तीचा भाव होता.

*'सद्गुरुची निज दया व्हावया, फिरते मन माझे।*

*काय करु साधना? कुणावर घालू मी ओझे?।।*

सर्व साक्षी सद्गुरु। तुम्हा का लागे सांगावे? असा निर्वाणीचा प्रश्न, ते आपल्या गुरुलाच विचारतात. आणि शेवटी म्हणतात - तुकड्यादास - 'भाव जाणूनि, उचित प्रेम द्यावे।' सद्गुरूची करुणा भाकणारे, त्यांचे हे भजन.

''सद्गुरूनाथा करि करुणा रे। कारण माझे हे, चंचल मन,

घाबरे होत आहे'', असे ते म्हणतात. त्यासाठी 'श्रवणी, मननी, निजध्यासनी, सद्गुरू गुण साठवी' असे गुरुपद तुकड्यादास मागतात. 'धन्य सद्गुरू! वैभव तुमचे, पाहुनिया मन हरी।' अशी त्यांची स्थिती आहे. ही गुरूची नामध्वजा त्यांनी अंबरी, फडकविली आहे. परोपरीने त्यांनी या 'गुरुमाय' ची आळवणी केली आहे, त्याखेरीज अन्य कोणताही उपाय नाही, अशी त्यांची खात्री पटली होती. 'गुरुपदी धरी, निर्धार आधी।' असे ते सांगतात. श्रवणी, मननी, निजध्यासादी भज गुरू वारंवार ही त्याची सर्वसामान्य जनांकडून गुरुभक्तीची अपेक्षा आहे. 'गुरुविण शांति ना मना' हे सगळ्याच सज्जनांचे मत ग्राह्य मानून, संत तुकडोजी महाराज, गुरुपायी सदाचे लीन झाले आहेत. आहे त्याचा अनुभव त्यांना आनंददायी आला. म्हणून ते म्हणतात, 'काय वर्णू थोरवी गुरुची, मज आनंदविले,' आणि मग गुरूकडे मागणे, मागतात.

*'आमुचे प्रेम, गुरुपदी राहो।*
*मोक्ष नको आणि स्वर्ग नको तो।*
*चित्त गुरु-गुण-गावो।।*

विस्मृत होऊनि संसारासी, ध्यानी सद्गुरु घ्यावो अशी आपली उत्कट गुरुभक्ती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी, आपल्या अनेक भावभक्ती रसाने भरलेल्या भजनांमधून साकार केली आहे. संत तुकडोजी महाराजांची ही रसाळ भजने या आशयघनतेमुळेच वारंवार ऐकाविसी वाटतात.

■ ■ ■

## क्रांतिगीता :

संत तुकडोजी महाराजांच्या 'क्रांती-वीणा' रुपी काव्यसंग्रहाचा झंकार, सर्वत्र निनादत आहे. लोकांना, वाचकांना ही 'क्रांतिगीता' खूप आवडली. म्हणूनच ती घरोघर पोहोचली. संत तुकडोजींचे नाव सर्वतोमुखी झाले.

'क्रातिविणे'च्या माध्यमातून वंदनीय महाराजांनी दिलेला संदेश, अत्यंत बोलका असून, त्यात तुमच्या सुशुप्ता अवस्थेतील, मनालाही चेतना देण्याचे सामर्थ्य आहे. समाजातील सर्व घटकांना एका प्रातिनिधिक स्वरुपात त्यांनी हितोपदेश केलेला आहे. त्यामध्ये देशभक्त आहेत. भक्तगण आहेत. महिला-पुरुष आहेत, श्रीमंत-धनिक आहेत. नवयुवक आहेत. अभ्यासू विद्वान आहेत. या सर्वांना तर त्यांनी जाणिव करून दिलीच आहे. पण परमेश्वरालाही साकडे घातलेले आहे. देवाचीही करुणा भाकली आहे. त्याच्या कृपेची अपेक्षा केली आहे. 'देवा तुला आमची कीव कशी येत नाही?' अशी खंत व्यक्त केली आहे. ही तुकडोजींची रक्तरंजित क्रांती नाही. त्यात घातपात, रक्तपात, मारामारी किंवा ॲटम बॉम्ब नसून त्यात प्रकाशकांनी म्हटल्याप्रमाणे त्याग, सेवा, सत्य, प्रेम आणि अहिंसा ही क्रांतीची शाश्वत मूल्ये प्रतिपादन केलेली आहेत. संत तुकडोजी महाराजांची, ही 'क्रांतिविणा' म्हणजे क्रांतीची पेटती, जागती मशाल झाली आहे. या क्रांती-वीणेच्या मंजुळ सुस्वराने, नादब्रह्माने आपले संसार सुखाचे व्हावेत आणि प्रत्येकाने या सामाजिक अहिंसक, क्रांतीचे अग्रदूत व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी या क्रांतिगीतात सामाजिक आशय व्यक्त केला आहे. उदा. 'भेदभाव कशाला? माणसा-माणसात रे' आम्ही क्रांतीचे वीर गडी रे, माणूस द्या, मज माणूस द्या' का व्हावे लहान? आम्ही भारत व्यापी महान :

विश्वशांतीचा अमर मार्ग संतांनी शोधला, 'जीवन व्यर्थची घालवू नको रे, वाईट मार्गे चालू नको' भारतीय नरवीर, तू राही सदा सिंहापरी, अशी ही नवक्रांतीची वीणा मंजूळ वाजे रे, अशी आशयगर्भ गीते म्हणजेच महाराजांची लोकप्रिय 'क्रांतिगीता' आहे. ती त्यांची अती आदराने म्हटली जाणारी भजने आहेत.

तरुणाला ते सांगतात, '

*संपदा सर्व सर्वांची। संतती राष्ट्रधर्माची।*

*भारत भू गुण कर्माची आहे,*

*उन्नत व्हाया देश। बना गोसावी रे,*

*आणि गोसावी बनून 'स्वातंत्र्य भारती आले।*

*झोपडीत अजुनि न शिरले। हे कार्य करा जे उरले।।*

*तुकड्यादास गमे, युग धर्मचि हा साजे रे, हे सांग सांग तरुणाला।*

खरे थोरपण कशात आहे, हे एका गीतातून संत तुकडोजी महाराज सांगतात -

*'अमर, तरिच मी, नवस्फूर्ती ने करीन पुरुषार्था'*

*आपुला-परका भेद न पाहता, सुखवीन दीन जनता।'*

पुढे महाराज म्हणतात, ते मोठे लक्षात घेण्याजोगे आहे.

*'मी म्हणजे मम देश, राष्ट्र मी, कुटुंब, महि ही सारी।।*
तुकड्या म्हणे हे केले, तरीच खरी थोरी।। येथे संत तुकडोजींनी 'वसुधैव कुटुंम्बकम्' ही कल्पना मांडली आहे. असा व्यापक आणि विशाल दृष्टिकोण आपण जपला पाहिजे. 'धनाचा मोह' या काव्यात त्यांनी आजच्या देशपरिस्थितीच्या संदर्भात अतिशय मोलाचा उपदेश केला आहे.

*'धनाचा मोह नसू दे मनी।'*
*रक्त असे हे कामकऱ्यांचे,*
*तोचि खरा घरधनी।।'*

लोक, देव दिसावा म्हणून दर्शनाला जातात, पण इथे देवच भीक मागतो की, 'माणूस द्या, मज माणूस द्या। तात्पर्य क्रांती ही विध्वंसासाठी नव्हे तर शांती प्राप्त व्हावी म्हणून करावयाची असते. परिवर्तन म्हणजे क्रांती – क्रांती म्हणजे रक्तपिपासा नव्हे, सेवाभाव हाच तिचा खरा पाया आहे. आमची क्रांती ही वीणा बनली पाहिजे असा हा बहुमोल संदेश संत तुकडोजी महाराजांचा आहे.

■ ■ ■

## राष्ट्रभाषेत ज्ञानदीप :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी, जशी मराठी तशीच हिंदीतूनही आपली भजने लिहिली आहेत. त्यातही विलक्षण गोडवा आहे. त्याला सुमधुर चाली दिलेल्या आहेत. अखिल समाजाला संदेश देताना महाराजांनी अक्षरश: ज्ञानदीप उजळले आहेत. आपल्या जीवनातील, सगळ्या वस्तुमात्रांमध्ये, ज्ञान आणि

अज्ञान दोन्हीही भरपूर भरलेले आहे. अर्थात् सद्प्रवृत्त आणि सद्प्रेरणा घेणाऱ्यांना, यथार्थ दृष्टी संपन्न माणसाला (वृत्तीने तो मुमुक्षु असल्यानं) ज्ञान प्राप्त होते. आणि मग त्याची ब्रह्मानंदी टाळी लागते. परंतु विकृत दृष्टिकोण असलेल्याने, खरे ज्ञान संपादन न केल्यामुळे, तो सद्प्रवृत्त नसल्याने, त्याने तपश्चर्या, भक्ती, वैराग्य, सन्यास, स्वीकारला अथवा जन्मभर भजने, संकीर्तने करीत राहूनही त्याला कोणताही लाभ होणार नाही. समाजात जेवढ्या म्हणून चांगल्या गोष्टी कथन केल्या जातात, अर्थातच् त्या सगळ्या, उन्नतीसाठीच आहेत; यात मुळीच शंका नाही. तथापि माणूस जेव्हा या सगळया चांगल्या गोष्टींचा 'धंदा', 'व्यापार' करू लागतो. ती वस्तू 'बाजारी' बनवितो, तेव्हा या सर्व गोष्टी केवळ सत्तेचे साधन बनतात. आपल्या स्वतःच्या मोठेपणाचे हत्यार, साधन होते. त्यामुळे या सर्व साधनांना विकृत अवस्था प्राप्त होते. आणि अशा साधनांना जवळ करणारे हे भ्रष्टच होतात.

संत तुकडोजी महाराज मोठ्या आत्मीयतेने आणि आस्थापूर्वक सांगतात की मित्रांनो! असे होऊ देऊ नका. मी माझी सगळी भजनावली पवित्र हेतूनेच लिहिली. ज्ञान आणि ध्यान एकाग्र करून, वाढवून देश आणि धर्माच्यासाठी माझ्या या भजनावलीचे लेखन झालेले आहे. त्याचा हाच लाभ, भजन गाणाऱ्यानी घेतला पाहिजे. 'या विचारमंथनाच्या आणि चिंतनाच्या आधाराने, माणसाने स्वतःच स्वतःला, ज्ञानवान, भक्तिवान, चारित्र्यवान आणि परोपकारी बनविले पाहिजे. तरच या

भजनभावाचे मोल, विश्वामध्ये प्रभावित होईल, येरव्ही नाही.' असा हा महाराजांनी दिलेला संदेश, आणि त्याच्या पूर्तीसाठी, तुकडोजी महाराजांच्या भजन-पद्यांचा जन्म झाला आहे. तीच महाराजांची खरी प्रेरणा आहे.

*''सत्ग्यान की, नैन निरखने, भाव का, सुरमा चढालिया।*
*तुकड्यादास कहे, इस तन का, धूप दीप जलवाया हूँ।।''*
*''फल आये, जागृत जीवन में, उमड रही है माया।*
*प्रभू भक्ति का, बाग लगाया।।''*

असे मोठे हृदयमंगम चित्र ते तल्लीन होऊन रेखाटतात. त्यांना देशोन्नतीची सतत चिंता लागलेली आढळते. ''कैसे देश जिएगा'' या गीतात, ते परखडपणे लिहितात,

*चारित्र्य, फनाही होगा। तब कैसे, देश जिएगा।*
*पानीही, जल जाए, तो कैसे? पंडित गलत करे, तब कैसे?*
*राजा भक्ष्य भरे, तब कैसे? साधुही, भोगी बनेगा।।*
*तब कैसे देश जिएगा।।'*

यासाठी तुकडोजी महाराजांनी सेवाधर्माला प्राधान्य दिलेले आहे. एका पदात ते म्हणतात -

'पहिले सेवा, फिर भगवान', जर प्रथम सेवा केली, तर भगवंताची प्राप्ती झाली असती - घरच्याघरी आपले मनोरथ, सेवाधर्म पाळल्याने पूर्ण होतात. असे हे सेवाधर्माचे माहात्म्य, जागोजाग त्यांनी आपल्या भजनातून समाजावर, बिंबविले आहे. 'ये मानव, व्यसन को छोड दे,' 'समय दान दे दो,' 'कैसी, दिवाळी मनाऊ मै?' 'जीवन के उजारे तुम हो,'

'कोयल गाने लगी,' अशा कितीतरी त्यांच्या हिंदी पद रचना विलोभनीय आहेत. त्यात एकाचवेळी राष्ट्रभक्ती, देशोद्धाराची तळमळ आणि आत्मोन्नतीचा, सर्वसामान्यांना दिलेला संदेश, प्रगट झाला आहे.

■ ■ ■

## आश्रमधर्म आणि ग्रामगीता :

संत तुकडोजी महाराजांच्या आज गावोगाव, घराघरात पोहचलेल्या 'ग्रामगीते' च्या तिसऱ्या अध्यायात 'आश्रमधर्म' स्पष्ट करून सांगितला आहे.

समाजशास्त्राच्या अध्ययनातही या आश्रम व्यवस्थेचा समावेश असतो. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि सन्यासाश्रम हे चार आश्रम रुढ आहेत. संत तुकडोजी महाराज या आश्रमाबाबत म्हणतात. 'ब्रह्मचारी राहणे' ही सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. परंतु ज्यांनी ब्रह्मचर्यव्रत स्वीकारले आहे त्यांनी मोठ्या निष्ठेने ब्रह्मचर्य पालन केले पाहिजे. विषयवासना आणि त्यातून उद्‌भवणारा अध:पात टाळला पाहिजे. ब्रह्मचर्याचा कालावधी २४ वर्षांचा आहे. या काळात संयम पाळावा. त्यामुळे संसार कार्य थांबत नाही. संत तुकडोजींच्या मतानुसार प्रत्येकाने संयम पाळावा. उन्नतीसाठी सर्व चारही आश्रमात संयमाची गरज आहे. बुद्धिमान माणसाने स्वैरवृत्तीने वागू नये पशूवत जीवन जगू नये. त्यामुळे त्याचा कोणताच आश्रम आणि संसार सुखाचा होणार नाही. संसार पंथ मोडू नये. प्रजाजनन खंडू नये. म्हणून

ब्रह्मचर्याश्रमातील ठेवा जपावा आणि सुयोग्य वेळी गृहस्थाश्रमात पदार्पण करावे. धर्मपालन गृहस्थाश्रमात आहे ते निसर्ग नियमांच्यानुसारच आहे. त्यातूनच गावाचा, व्यक्तीव्यक्तींचा, पर्यायाने राष्ट्राचा विकास घडून येतो. हीच समाजधारणा असते. असे हे जीवनातील टप्पे सत्कारणी लावावे. संयमाने जो तो, प्रत्येक आश्रम आपण सार्थकी लावावा. ब्रह्मचर्य, वैवाहिक, वानप्रस्थी जीवन त्या त्या अपेक्षेनुसार संयमाने जगावे.

*"जयासी साधे इंद्रियदमन, वृत्ती सत्कार्यी रमे पूर्ण।।"*

या उक्तीप्रमाणे आश्रमधर्म सफल होत असतो.

संत तुकडोजी सांगतात. गृहस्थाश्रमात अधिक जबाबदारी वाढत असते. आपले कुटुंब, पत्नी, ज्ञानी जन यांना बरोबर घेऊनच जीवनमार्ग सुधारावा लागतो. प्रपंचाचा भार पेलावा. समाजधर्म पाळावा. यासाठीच संतांचे प्रबोधन आहे. माणसाने सात्विक मार्गाचा अवलंब करावा. आचरण शुद्ध ठेवावे. पती पत्नी दोघांनी संयम पाळावा. तरच हा गृहस्थाश्रम यशस्वी होतो. आपले नातेवाईक, समाजपरिवाराला आपल्या वागण्याने – मोह पाडावा. अशा रीतीने आपण वागावे, साधुसंतांच्या सहवास मार्गदर्शनाने आपले ऋषिऋण फेडता येईल. सत्संग, अध्यात्म गृहस्थाश्रमींना तारतो. देशसेवा, संस्कारक्षम भावी पिढी घडवून पितृऋण फेडता येते. भगवंताच्या, धर्माच्या अधिष्ठानाने देवऋण फेडता येते.

'उचित करावी कुटुंब, जीव, ग्राम सेवा' याला फार महत्त्व तुकडोजींनी दिले आहे. पंक्ती प्रपंच न करता समत्व बुद्धी आपण हे खऱ्या गृहस्थाश्रमाच लक्षण आहे. माणूस आणि

प्राणी इथेच वेगळे ठरतात. वासना टाळा. समाज, देशसेवा महत्त्वाची, प्रयत्नवादी माणसाला प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आत्मोद्धार साधता येतो. सगळे विश्वच 'घर' मानावे. म्हणजे आत्मोन्नती साधते. राष्ट्राची सत्यस्थिती जाणून घ्यावी. आपण अनासक्त व्हावे, सेवेची दीक्षा घ्यावी आणि सर्वांची सेवा करावी. शिक्षण, आश्रम, सत्संग, परमार्थ संस्था शांततेसाठी राबवाव्यात.

*'अंध, पंगू, महारोगी। अनाथ आणि वृध्द जगी।*
*आश्रम चालवावं जागजागी। त्यांच्या सेवेचे।।*

जनसेवा, राष्ट्रसेवा यास्तव वानप्रस्थाश्रम आणि सन्यासाश्रम कारणी लावावा. प्रत्येकाने आपले जीवन सफल करून घ्यावे.

■ ■ ■

## कर्मयोगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विसाव्या शतकातील महान कर्मयोगी होते. त्यांनी समाजामध्ये

'संत तोचि देव। आणि देव तोचि संत' अशी दृढश्रद्धा निर्माण केली. सर्वांसाठीच या संतांच चरित्र विशेष विलोभनीय आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अगदी साध्या वेषात वावरत असले; त्यांची राहणी अत्यंत साधी असली तरी 'वेष असावा बावळा, परि अंतरी नाना कळा' या न्यायाने त्यांनी केलेल्या निष्काम सेवेतील सौंदर्य मात्र तुमच्या आमच्या अंत:करणाला स्पर्श करीत. म्हणून संतचरणी लोक नतमस्तक होतात. नामवंत, श्रीमंत, समाधानी सगळ्यांनाच हे करावे लागते.

त्यांच्याबद्दलचा आदरभाव व्यक्त होतोच. राष्ट्रसंत तुकडोजी कर्मयोगी होते. म्हणून या कर्मयोगी संताचे चरित्र हा आपल्या समाजाचा फार मोठा ठेवा बनला आहे. त्यांचा कार्याचा सुगंध दीर्घकाळ दरवळत राहतो, तो याचमुळे!

आपल्या अज्ञानातून सामाजिक परवशता, अंधश्रद्धा दारिद्र्य जन्माला येत असत. त्यासाठी तुकडोजींनी शिक्षण, श्रमप्रतिष्ठा, लोकजागरण, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, आरोग्यसाधना, ग्रामस्वराज्य असे विविध उपक्रम आणि प्रकल्प, समर्थग्राम निर्मितीसाठी हाती घेतले. आणि समर्थग्रामातूनच समर्थ भारताच्या निर्मितीला चालना दिली. असे समाज आणि देशसुधारण्याचें काम तुकडोजींनी केले. त्यासाठी त्यांनी हातात खंजिरी घेतली. आणि आपल्या हृदयभेदी शब्दाबरोबर गगनभेदी हाक दिली. सारा समाज जागविला. त्याचे सोपे तत्त्वज्ञान भजन संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य लोकांत रुजविले. कर्म, अकर्म आणि विकर्म या भगवद्गीतेतील तत्त्वज्ञानानुसार या महान कर्मयोग्याला आत्मोन्नतीचा खरा मार्ग गवसला. जनमाणसातही या कर्मयोग्याबद्दल दृढ श्रद्धा निर्माण झाली आहे. राष्ट्रसंत तुकडोजींची सामाजिक जाणिव प्रगल्भ होती. आणि समाजसुधारणेसाठी त्यांनी संपूर्ण समर्पण केले होते. त्यांची उपलब्ध ग्रंथसंपत्ती याची आज साक्ष आहे. 'ग्रामगीता' पाहा किंवा त्यांच्या मराठी हिंदी भजनावलीच्या पुस्तिका पाहा त्यातून आपल्याला हाच प्रत्यय येतो. 'ग्रामनिर्माण कला' या तुकडोजींच्या ग्रामगीता रहस्यातील या पंचकाने श्रमप्रतिष्ठेचे मोल पटवून दिले आहे.

राष्ट्र बलशाली करण्यासाठी, समाजाला ग्रासणाऱ्या रुढी परंपरा, ज्या घातकी ठरतात त्या नाहिशा केल्या पाहिजेत. याच भावनेतून वंदनीय तुकडोजींनी समाजजीवनाच निरीक्षण केले. ते अनुभवले, नीट समजून घेतले. आणि मग मानवतेचे पुजारी होऊन त्यांनी समाजक्रांतीची मशाल हातात घेतली. आयुष्य समाजकार्याला वाहिले. विदर्भात त्यांचा जन्म आणि वावर असला तरी त्यांचे कार्य मात्र विश्वव्यापी बनले. ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग, हे तिन्ही योग त्यांना साधले. त्यांची देशभरची भटकंती, मानवतेची पुरस्कर्ती ठरली. 'मनुष्य देहाचेनि ज्ञाने। सच्चिदानंद पदवी घेणे' याची प्रचीती आणि सिद्धी त्यांना प्राप्त झाली. 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' या उक्तीप्रमाणे त्यांनी केलेले कार्य लक्षात घेऊन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना 'राष्ट्रसंत' म्हणून एवढ्यासाठीच सन्मानित केले होते.

अक्षराची फारशी ओळख नसूनही संत तुकडोजी यांनी आपल्यासाठी अक्षर वाङ्मय ग्रामगीतेच्या रूपाने मागे ठेवले. ह्यातीत आपली 'अमृताहुनी गोड वाणी' समाजात सतत प्रवाही ठेवली. कर्मयोग्याची भूमिका बजावून केलेली मानवमंदिराची निर्मिती, गुरुकुलाची उभारणी आज त्यांच्या महान कार्याची साक्ष देत आहेत. ते म्हणतात –

*'कामाकरिता जाती केली। काम विसरुनी जातच धरली'*

ही अशी स्थिती, जातीला मूठमाती देऊन संपवावी.

## समाजऋणाचे भान :

आपल्याकडे देवऋण, ऋषिऋण, पितृऋण अशा ऋणांतून उतराई होण्याच्या कल्पना मांडलेल्या आहेत. पण चवथे ऋण म्हणजे 'समाज ऋण' फार महत्त्वाचे आहे. संत तुकडोजी महाराजांनी समाजऋणालाच आपल्या जीवनात सगळ्यात महत्त्वाचे स्थान दिले आहे. एक कृतिशील समाजसुधारक म्हणून त्यांनी समाजाला दिशा प्राप्त करून दिली. देवभक्ती आणि देशभक्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. 'धर्म' म्हणजे मनुष्यात स्वभावतः असलेल्या सामर्थ्याचा आविष्कार होय. असे आपल्या समर्थवाणीने तुकडोजींनी सांगितले. उदार हृदयाचे, विशाल बुद्धीचे आणि थोर कृतीचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज खरे कर्ते समाजसुधारक होते. म्हणूनच त्यांच्या नावाने विविध प्रकल्प आणि उपक्रम हाती घेतलेले आहेत. एवढेच नव्हे तर, नागपूर विद्यापीठाला संत तुकडोजी महाराजांचे नाव दिलेले आहे. त्यामागे त्यांची कठोर तपश्चर्या आहे. त्यांनी अखंडपणे जीवनभर चालविलेला जनसेवेचा, कवित्वाचा आणि आपल्या हृदयस्पर्शी अमोघ वक्तृत्वाचा. संगीताचा 'ध्यास' आहे. त्यांनी राष्ट्राभिमान जोपासला. सर्वधर्म समभाव आणि परधर्म सहिष्णुता संवर्धन केले. सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून दिली. एका साध्या खंजिरी वाद्याची ही सगळी करामत आहे. आजही तिचा आवाज निनादत आहे.

*'अवघेचि सुखी असावे' '*

*सबका भला करो यही आवाज करेंगे'*

असे म्हणत राष्ट्रसंत तुकडोजींनी समाजपरिवर्तनाची चळवळ हयातभर चालविली आहे. समाजाला खडबडून जागे केले. 'विचारे शुद्धता: आचारे दृढता' या न्यायाने उक्ती आणि कृती यात एकवाक्यता ठेवली. समाजपरिवर्तनाचे अग्निकुंड सतत धगधगत ठेवले.

बाह्य अवडंबरापेक्षा वस्तुस्थितीचे दर्शन त्यांनी समाजाला घडविले. कालोचित तेवढेच स्वीकारावे कालबाह्य असेल ते टाकून द्यावे, हे त्यांचे धोरण होते. एखाद्या उदाहरणाने समाजाचे स्वरूप कधीच लक्षात येत नाही. त्याच विस्तृत आणि सखोल सत्यान्वेषी, ज्ञान करून घेऊनच खऱ्याखुऱ्या 'समाजस्थितीचा उलगडा होऊ शकतो असे त्यांनी आग्रहानी मांडले. ११ नोव्हेंबर, १९४३ ला तुकडोजी यांनी श्री गुरुदेव सेवा मंडळाची याच हेतूने स्थापना केली. मानवसेवा हीच खरी देवपूजा त्यांनी मानली. 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' आणि 'जगाला प्रेम अर्पावे' 'बलसागर भारत होवो' हीच कल्पना सानेगुरुजींनी मांडली होती. तेच ध्येय संत तुकडोजी महाराजांचे होते. देशभक्त हा कनवाळू असतो. उपेक्षित अलक्षितांच्या सेवेत आनंद घेतो. समाजातील रंजल्या गांजल्यांसाठीच तो जगतो.

सामाजिक समरसता, प्रस्थापित झाल्याशिवाय, खरा सामाजिक न्याय अस्तित्वात येऊ शकत नाही. निकोप समाजरचना निर्माण होत नाही. त्यासाठी सर्व भेदभाव विसरून, विषमतेला नाहीसे करूनच, माणसातले 'सत्व' जागे करून, समाजाची

उन्नती साधू शकेल हे तुकडोजी महाराजांच्या स्वीकृत तत्वज्ञानाचे सारसर्वस्व होते. गुरुदेव सेवा मंडळ, प्रार्थना मंदिर, ग्रामगीता, ग्रामनिर्माण, आनंदामृत, श्रमदान, विश्वशांती सप्ताह (१९४३) बलिदान बंदी, नशाबंदी, आखाडा संघटनेना अशा विविध उपक्रमांतून आणि प्रकल्पातून त्यांनी समाजाची निष्काम सेवा केली. नवी जीवनदृष्टी समाजाला दिली.

*भगवद्गीतेचे हे सक्रीय रूप। प्रगट झाले आपोआप।*
*अर्जुनासम व्हावे महाप्रताप। सर्व ग्रामीण म्हणौनी ।।१०१।।*
*श्री ज्ञानराज गुरु माऊली। त्यांच्या कृपादृष्टीची साऊली।*
*परंपरेने फळासि आली। ग्रामगीता स्वरूपाने ।।१०४।।*

(अध्याय ४१)

■ ■ ■

## सारे काही आत्मविकासार्थ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी, चारही विहित आश्रमधर्म उत्तमरीतीने पाळल्यास व्यक्तिगत कल्याण तर होतेच, शिवाय समाजधारणा होते, असे मानले. राष्ट्रसेवा अध्यात्मसाधनेतून साधते. सन्यासाश्रम मोक्षप्राप्तीसाठी आवश्यक आहे. संत म्हणतात, ''सन्याशी सर्वांशीच होणे आहे। त्याविण मोक्षाची नाही सोय।। मोक्षावाचोनि तरणोपाय दुसरा कोठे?''

आत्मविकासाला वयोमर्यादा नसते, असे महाराज म्हणतात. अतिवृध्दांनाही तो साधता येऊ शकतो. या तुकडोजींच्या विचाराने फार मोठा दिलासा वयोवृध्दांना मिळतो.

मात्र बहिरंग दीक्षेचे सोंग कोणी घेऊ नये. संस्कार महत्त्वाचे, त्यावर विश्वास ठेवावा. धर्म दीक्षेबरोबरच महत्त्वाचे, व्रतदीक्षा, गुरुदीक्षा, संप्रदाय दीक्षा, आश्रमदीक्षा, कार्यदीक्षा या सर्वच दीक्षांनी माणसाचे मन तयार होते. त्यासाठी नित्यकर्म-आचरण करावे.

*''जी दीक्षा ज्यानं घ्यावी। त्यानं ती पथ्ये सांभाळावी,*
*वृत्ती वाकडी होऊ न द्यावी। वाईट कर्मे।।''*

दीक्षा घेतात, पण पेलवत नाही. त्यामुळे फटफजिती होते. यासाठी संत तुकडोजी महाराजांनी एक चांगले उदाहरण दिले आहे. एका अशाच साधकाचे विनोद बुद्धीने मोठे हास्यास्पद वर्णन तुकडोजींनी केले आहे.

''एकदा एका साधकाला वैराग्य आले. त्याने मग घरदार सोडले. तो लंगोटीवर वनात आंघोळ करू लागला. स्नानानंतर तो लंगोटी वाळविण्यासाठी एका झाडावर टाकू लागला. तिथे उंदीर येऊन त्याची लंगोटी कातरू लागला. कुरतडू लागला. तो लंगोटी मागायला पुन्हा पुन्हा गावी जाऊ लागला. मग लोकांनी त्याला मांजराची पिले पाळायला सुचविले. त्याने तुझ्या लंगोटीचे राखण होईल. त्याने मांजरीची पिले पाळली; पण त्या सन्याशाला पिलांच्या खाण्यापिण्याची काळजी लागली. मग गावकऱ्यांनी त्याला गाई पाळायला सूचविले म्हणजे मग शिवाय चांगला दही, दूध, लोण्याचा 'सात्विक' आहारही तुला मिळेल. म्हणून त्या विरक्ताने गोधन जमविले. पण मग त्याला चाऱ्याची चिंता लागली. तेव्हा लोक त्याला म्हणाले थोडी शेती घ्या चाऱ्यासाठी. तीही घेतली. मग

त्याची गडी माणसे आली. धनधान्य जमा झाले. पण हे सांभाळायचं कसे आणि कुणी? असा प्रश्न पडला. लोक म्हणाले, 'असं करा! जो चोर नाही, आळशीही नाही, असा इमानदार माणूस तुम्हांला मिळणार नाही. शेवटी आपले मन आणि धन सांभाळावे म्हणून त्या वैराग्याने लग्न केले. त्या बिचाऱ्याचे ब्रह्मचर्य गेले. पुन्हा तो संसारात गुंतला.'' त्या वैराग्याच्या उदाहरणाने संत तुकडोजींनी पटवून दिले की वैराग्य प्राप्तीसाठी, फार मोठा त्याग करावा लागतो. त्यापेक्षा गावाची सेवा करा. म्हणजेच देवाची सेवा करा. त्यागातच खरे वैराग्य आहे.

*''ऐसा सन्यास सर्वांनी घ्यावा।*
*आधी आपुला प्रपंच सावरावा।*
*मुरलिया फळापरी सुकवावा। समाज मग।''*

हे पाहिल्यावर आपल्याला समर्थ रामदासांचे स्मरण होते.

*''आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे, परमार्थविवेका।।''*

आपण काम केल्याशिवाय फुकटच अन्न खाऊ नये. आपल्या स्वतःच्या मुलांप्रमाणेच इतर सर्व मुले मानून त्यांच्या जोपासनेचे व्रत घ्यावे. परमार्थाच्या नावासाठी प्रपंच सोडू नका. आपल्या बायका–मुलांचा त्याग करू नका. भक्तीमध्ये दंग व्हा. रंगून जा. परोपकार करा. वैराग्य वाढवा. हाच तुकडोजींनी राजमार्ग सांगितला आहे. संत तुकडोजींनी गृहस्थाश्रमाची थोरवी अतिशय चांगल्या प्रकारांनी मांडली आहे. ते म्हणतात – 'गृहस्थाश्रमातच समाजाचे सर्वांचे आगत स्वागत आणि भरण–पोषण करता येते. एरव्ही ते शक्य होत नाही. गृहस्थी बनूनही उत्तम परोपकार करता

येतो. समाजहित साधते. गृहस्थी हा तनमनाने कष्ट उपसतो तर संन्यासी सन्मार्गदर्शन करतो. यासाठी अहंकार, हीनतेची भावना विसर्जित करा. परस्परांचा आदर करा आणि वाढवा. धन कष्टाने वाढवावे आणि ते सत्कारणी लावावे. अशा नेटक्या प्रपंचातच परमार्थ साधतो.' असा प्रपंच परमार्थाचा समन्वय समर्थ रामदासांप्रमाणेच तुकडोजी महाराजांनी 'ग्रामधर्म' म्हणून सांगितला आहे.

■ ■ ■

## *उजळा ग्रामोन्नतीचा दिवा :*

*'जन्मोनिया नाही। साधिले स्वहित।*
*तयाचे जीवित। माती मोल।।*
*कासया जन्मला। आला तैसा गेला।*
*वाया कष्टविला। निजदेह।*
*सुखासाठी केला। संसाराचा धंदा*
*भोगिली आपदा। नानापरी*
*स्वामी म्हणे त्यासी। कैसे समाधान।*
*अंती नागवण। सर्वस्वीची।।*

येथे स्वामी स्वरूपानंदानी मनुष्य जन्माचे सार्थक कशात आहे. हे सांगितले. असेच आपल्या जीवनाचे सार्थक, हा भाव लक्षात घेऊन, संत तुकडोजींनी करून घेतले आहे. संत तुकारामांची उक्ती पहा.

*'धन मिळवोनी कोटी। सवे न येरे लंगोटी।*
*पाने खाशील उदंड। अंती जाशी सुकल्या तोंड।*

*पलंग न्याहल्या, सुपती। शेवटी गोवऱ्या सांगाती।*

यातले मर्म जाणून या राष्ट्रसंतांने आपले जीवन यशस्वी केले. मानवताधर्म त्यांनी अवलंबिला. सत्य, प्रेम, शांती-सेवा, त्याग, सदाचरण ही सर्व नैतिकमूल्ये सर्वधर्मांतून त्यांनी वेचली. त्यांचा संदेश 'हम सब एक है।' आम्ही सर्व एक आहोत' असाच आहे. समाजातील सर्वच घटकांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. माणसा माणसातला विश्वास आणि आत्मविश्वास त्यांनी जागविला. माणसातील सामर्थ्याची त्यांनी जाणीव करून दिली; माणसाचे आत्मबळ वाढविणारी शिकवण दिली. व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. सद्सद् विवेक बुद्धीवर आधारित गुरुदेव चळवळ, खेड्यापाड्यात पोहचविली. प्रबोधनासाठी ग्रामपातळीवर ग्रंथालये उभारण्याचा त्यांचा संकल्प होता. जात, प्रांत, वंश भेदाभेद विरहित सर्वधर्म समभावाच्या सूत्रांचा अवलंब त्यांनी भारतीय जनतेला, करण्यासाठी प्रवृत्त केले. 'देवाघरी एकचि प्राणी। ना श्रीमंत, ना भिकारी कोणी। हा निसर्गदत्त सिद्धांत आहे. पण माणसातील षड्रिपू जागे। 'अनाठायी' होतात. आणि त्यातून मतभेदाचा अनर्थ घडून येतो. समाजरचना स्थिर राहावी, प्रत्येकांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात आणि सर्वांना आपापल्या पात्रतेनुसार आणि कुवतीनुसार रोजीरोटी मिळावी ही त्यांची तळमळ होती. तुकडोजींचा भांडवलशाही, सरंजामशाही, जमीनदारी पोषणकर्ते यांना तीव्र विरोध होता. त्याचा ठिकठिकाणी त्यांनी निषेध केला आहे. श्रमिक वर्गाचे शोषण आणि स्वार्थी वृत्तीचे

बोकाळणे त्यांना संमत नाही.

वस्तुतः *"कामे सर्वचि मूल्यवान। त्यांची योग्यता समसमान"* हा विचार संत तुकडोजींनी ग्रामगीतेत मांडला आणि 'श्रम' हेच खरे भांडवल आहे असे म्हटले आहे. त्यांनी श्रीमंतांचे धन ही गावची संपत्ती मानली. आपल्याजवळ अधिक असल्यास, ते गावाला पुरवावे. गरिबांचे रक्तशोषण म्हणजे आपले धन, हे श्रीमंतांनी लक्षात घ्यावे आणि श्रीमंतांनी गरिबांचे श्रम ही गावची दौलत आहे हे लक्षात घ्यावे. परस्परांवर विश्वास ठेवून देवाण घेवाण करावी यास्तव त्याग आणि सहानुभूतीची गरज आहे.

*उत्तम व्यवहारे धन घ्यावे। उत्तम कार्यासाठी लाववीत जावे।*
*जेणे परस्परांचे कल्याण व्हावे। तैसेचि करावे व्यवहार।।*

सामाजिक बांधिलकी मानून समाजपरिवर्तन घडवावे. चैन विलास सोडावे, असे ते म्हणतात.

*"दुनिया आहे कष्टिकांची। जो जो कसेल शेती त्याची*
*जो काम करील लक्ष्मी त्याची। दासी व्हावी नियमाने।।"*
*विद्वानाने, शिक्षिताने। महंताने, श्रीमंताने।*
*कष्ट कराया मुद्दाम लागणे। हेचि मोठेपणाचे।।*

तुकडोजी महाराज कळवळून लोकांना जागवून समरसता बंधुभावाचा मोलाचा संदेश देतात.

*गावागावासि जागवा। भेदभाव हा समूळ मिटवा।*
*उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकड्या म्हणे।।*

'श्रम' हा जीवनाचा मूलाधार आहे. श्रम ही देहातील संपत्ती

निसर्गाने दिलेली आहे.

*'निषिद्ध आणि सकाम कर्म। तैसेचि त्यागुनि अहं-मम।*
*जगासाठी करावेत श्रम। तेचि खरे कर्म।।*

सगळ्यांना जरी कर्म करावे लागत असले, तो निसर्ग नियम असला तरी माणसाकडून असे जगासाठी कर्म अपेक्षित आहे. टोपलंभर शब्दांपेक्षा मूठभर कृती श्रेष्ठ आहे. मातृभूमीला सुखी करा. भरपूर उत्पादन करा. गावाचे धन वाढवा. जनता जनार्दनाची सेवा प्रघात आहे, तेच खरे कर्म.

■ ■ ■

## गावची आहे तीर्थ :

आपल्या देशात खूप काम व्हावयाचे अद्यापही बाकी आहे. दारिद्र्य दुःखावर मात करायची आहे. अर्धपोटी, अर्धनग्न लोकांना अंगभर कपडा आणि पोटभर अन्न द्यायचे आहे. अज्ञानाचा अंध:कार आणि मुक्तसंचार समाजातून नाहिसा करावयाचा आहे. म्हणून संत तुकडोजी म्हणतात -

*''म्हणोनि सर्वांनी काम करावे। ग्रामाचे धन वाढवावे*
*येथे गरीब, श्रीमंत न पाहावे। कामासाठी-''*
*''उद्योगाचा चालला सपाटा। ऐसे व्हावे''*

मजुरांनी आपली कर्मनिष्ठा जपावी, तर श्रीमंतांनी आळशी बनू नये. तरच आपल्या समाजाची उन्नती होईल. यासाठी

*''श्रमनिष्ठेचा करावा प्रचार। सर्वांसि आपुलकी वाटे पुरेपूर।*
*ऐसी व्यवस्था करावी सुंदर। गावचे उत्पादन वाढवूनी।।*

ग्रामोद्योग करावे. जोडधंदे करावे. कलावंतांना उत्तेजन मिळेल अशा कलाकुसरीच्या वस्तू करव्यात.

*ऐसी असावी कलाकुसरी। उद्योगधंदे घरोघरी*
*जराही न दिसेल बेकारी। वाढली कोठे।।*
*यासाठी प्रत्येक घटक सज्ञान। पाहिजे निरोगी, उद्योगी, संपन्न।*
*तरीच ते गाव आदर्शाचे भूषण। मिरवू शके.*
*ऐसी करावी ग्रामसेवा। हेचि कर्म आवडे देवा।*
*संशय काही मनी न धरावा। तुकड्या म्हणे।।*

'स्वत: जगा आणि इतरांनाही जगू द्या। हा त्यांचा विश्वसंदेश आहे.

भूमी दानातून धनदान, विद्यादान, जीवनदान, ग्रामदान या संकल्पना पुढे येऊन हे दान देण्याचे आवाहन राष्ट्रसंतांनी जनतेला केले.

*'पुकार भूमिदान की, यह देश की किसान की।*
*सुजान की अनजान की, यह हवा है तुफान की।'*

'यवतमाळ' जिल्ह्यात त्यांनी सुरु केलेल्या भूदान चळवळीत केवळ अल्पावधीत ११४१० एकर जमीन त्यांनी भूमिदानात मिळवून दिली.

तुकडोजी महाराजांनी विविध क्षेत्रातले मननीय विचार मांडले, त्यात महिलांच्या उन्नतीचा विचार महत्त्वाचा आहे. ग्रामगीतेच्या २० व्या अध्यायात महिला उन्नती विषय आला आहे. स्त्रियांनी महापुरुषांना, लढवैय्यांना, थोरसंतांना जन्म दिले. स्त्रियांवर समाजाकडून होणारे विविध प्रकारचे अन्याय त्यांना

मान्यच नव्हते. स्त्रियांचा त्याग त्यांना ना मंजूर आहे. ते म्हणतात.

काय स्त्रियांनी युद्ध नाही केले? पति, पुत्रांनाही प्रोत्साहन दिले. स्त्रियांनी आपल्या ब्रीदासाठी प्राणार्पण केले आहेत. जर स्त्रियांची हेळसांड झाली, तर राष्ट्राची अवनती होते. स्त्री शिक्षणाची आवश्यकता त्यांनी सांगितली त्याचबरोबर महिलांचे संघटन आवश्यक असले पाहिजे. हे स्पष्ट शब्दांत मांडले पुढे माता, शिशुसंगोपन, महिला, बाल कल्याण विचार त्यातूनच समाजात रुजला. आज महिलांच्या संघटना ठिकठिकाणी आढळतात. स्त्रीशक्ती जागी झाली आहे. कायद्यानेही त्या महिलांना संरक्षण दिले आहे.

निसर्गातील वैचित्र्य आणि वैविध्य यातील सौंदर्य टिपावे त्यापासून धडे गिरवावेत. समाजातील दु:ख वेचावे तरच व्यक्तीचा जन्म सार्थ होऊ शकेल. 'गावाकडे चला' 'खेड्याकडे चला' असे महात्मा गांधींप्रमाणेच त्यांचे सर्व बुध्दिवंत, गुणीजनांना आवाहन आहे. महिलांप्रमाणेच बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा कारण उद्याचे राष्ट्र घडविणे त्यांच्याच हाती आहे. तिच मुले, खरे उद्याचे राष्ट्र घडविणारे शिल्पकार आहेत.

*या कोवळ्या कळ्या माजी।*
*लपले ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी।*

मुलांमध्ये असलेल्या सामर्थ्याची जाणीव त्यांनी वेळच्या वेळी करुन दिली. यावरून तुकडोजींचे विचार कसे सर्वस्पर्शी होते ते दिसून येते.


*'गावची आहे तीर्थ,' 'कशाला काशी जातो रे बाबा'*

*'कशाला पंढरी जातो,*

– असे ते म्हणत असत.

दुसऱ्यासाठी जगायला शिकावे. स्वत:साठी जगणे जीवन नाही. ते मरण आहे, असे त्यांचे विचार मूलगामी होते. 'बहुतांचे बहुतम सुख' हाच त्यांचा स्थायी विचार होता. 'मंदिरात नाही दिसला सावळा मुरारी' तर तो परमेश्वर त्यांना रंजल्या गांजल्यामध्ये दिसला. अशा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याचे सतत चिंतन घडावे. त्याचे अनुकरण व्हावे त्याचे मनन करावे आणि आजही ते कार्य पुढे चालवावे.

अशा या थोर राष्ट्रसंताचे गुरुकुंज आश्रमात ११ ऑक्टोबर १९६८ ला महानिर्वाण झाले. आज त्याच ठिकाणी त्यांची समाधी आहे.



# डॉ. भास्कर गिरधारी यांचे प्रकाशित ग्रंथ

१) अभिव्यक्ती / प्रस्तावना : वि. वा. शिरवाडकर / १९७७

२) आलेख / १९८१

३) मराठी शुध्दलेखनाचा मार्ग/१९८५

४) मराठी साहित्यातील यमाती/प्रस्तावनाः डॉ. गो. के. भट/(१९८९)

५) साप्ताहिक 'करमणूक'/ प्रस्तावनाः डॉ. भालचंद्र फडके (१९९१)

६) कर्ण आणि मराठी प्रतिभा/(१९९२)

७) पंडिती साहित्य/(१९९२)

८) आरसाः आदिवासी जीवन शैलीचा/ प्रस्तावनाः केशव मे आर (२००४)

९) मराठी लेखन शुध्दी/ प्रस्तावनाः डॉ. राजाभाऊ गायधनी (२०१२)

१०) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजः जनजागरण कार्य (२०१६)

**संपादित लेखन**

११) पी. एच्. डी. प्रबंधः रुपरेषा आणि निष्कर्ष (१९८०)

१२) महाभारतातील दुर्गास्तोत्र (१९८२)

१३) नामदार गो. कृ. गोखलेः जीवन परिचय (१९८३)

१४) मध्ययुगीन वाड्मय प्रवाह (२००२)

१५) चळवळी माणूस (२००३)

१६) वनदासी कोकण शब्दकोश(२००४)

महाभारत आणि मराठी ललित साहित्यः प्रस्तावनाः राम शेवाळकर (अप्रकाशित)

## लेखकाचा परिचय



डॉ. भास्कर गिरधारी यांचे सध्या पुणे येथे वास्तव्य आहे. त्यांनी विविध महाविद्यालयात मराठीचे प्रदीर्घकाळ अध्यापन केले. प्राचार्य म्हणून २१ वर्षे सेवापूर्ती. बी.ए., एम.ए.विद्यापीठात प्रथम श्रेणीत सर्व द्वितीय क्रमांक प्राप्त.

शासनाची दक्षिणा फेलोशिप प्राप्त. त्यांनी ''महाभारतावर आधारित मराठी ललित साहित्य'' या विषयावर पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी संपादन केली. विद्यार्थीदशेत अनेक नामवंतांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. ते पीएच.डी.चे मार्गदर्शक असून त्यांचे २३ विद्यार्थी पीएच.डी. व १४ विद्यार्थी एम.फील. झाले आहेत.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे, आणि शासकीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांत त्यांनी विविध महत्त्वाच्या पदावरील जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. त्यांनी आपल्या लेखनात सातत्य ठेवले असून, त्यांचे १२ ग्रंथ, ५ संपादने प्रकाशित आहेत. आजवर २५ पुस्तकांना प्रस्तावना दिलेल्या आहेत. २० ग्रंथात त्यांचे लेख समाविष्ट आहेत. विविध विषयावरील एक अभ्यासू, प्रभावी वक्ते, प्रवचनकार म्हणून उभ्या महाराष्ट्राला ते परिचित आहेत. आतापर्यंत २१ महनीय पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. वाचन, लेखन, समाजसेवा, व्याख्याने, प्रवचने या त्यांच्या आवडीच्या कार्यक्षेत्रात ते नेहमीच सक्रीय आहेत.

संपर्क पत्ता : 'ए' विंग ४०१ सदनिका, शुक्रतारा संकुल, सिंहगड पथ,
पुणे ४११०३०. चलभाष : ९८२३०१२३०१,
E-mail : bvgirdhari@gmail.com • Website : www.bvgirdhari.com

Suvidha - 9326575775